ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

# शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.

# शिवराज

१९७१-७२

: संपादक मंडळ :

अध्यक्ष- प्राचार्य : अंबादास माडगूळकर
प्रमुख संपादक- प्रा. चंद्रकुमार नलगे
मराठी विभाग- प्रा. व्ही. एस्. वन्ने
हिंदी विभाग- प्रा. डॉ. एस्. जी. गोकाककर
इंग्रजी विभाग- प्रा. एन्. आर. ढुंडगेकर
विद्यार्थी प्रतिनिधी- श्री. एम्. आर. पाटील
श्री. व्ही. जी. धुमे
मुखपृष्ठ- रवि चपाले

Scanned with CamScanner

सर्वांग सुंदर व्यक्तिमत्व....



प्राचार्य अंवादास दिगंवर माडगूळकर.

१५-६-१९६९ ते १६-६-१९७४

Scanned with CamScanner

# आमचे प्राध्यापक



डावीकडून (बसलेले) १) प्रा. सौ. जगताप एस्. एम्. २) प्रा. दुंडगेकर एन्. आर. ३) प्रा. बन्ने व्ही. एस्. ४) प्रा. जाधव एस्. टी. ५) मा. प्राचार्य कुलकर्णी–माडगूळकर अं. दि. ६) प्रा. सोरटे बी. क. ७) डॉ. गोकाककर एस्. जी. ८) प्रा. पंडीत ए. एस्.

डावीकडून (पाठीमागे बसलेले) १) श्री. नाळे ए. एस्. २) प्रा. गजेंद्रगड व्ही. एन्. ३) प्रा. शहा पी. जी. ४) प्रा. जोशी एस्. एस्. ५) प्रा. कुलकर्णी पी. जी. ६) प्रा. डिक्कर डी. जी. ७) प्रा. कुराडे के. व्हो. ८) प्रा. नलगे एन्. सी. ९) प्रा. पोवार ए. ए.




—विद्यार्थी मनात काहीतरी घसळत असतं. बेचैन बनवतं. त्याला वाट हवी असते. आविष्काराची असोशी असते. ही असोशी अशीच दाबून राहिली तर व्यक्तित्व खुरटतं. प्रस्फुटता लाभली तर त्याला नवनवे धुमारे फुटनात. मधुरमधुर कळचा लगडतात. डेरेदार वृक्षवल्ली, लतापल्लवं लहरू लागतात. त्या संधी त्यांना द्यायच्या असतात. अशा वाटा त्यांना मिळवून द्यायच्या असतात. अंगभूत कलागुणांना अवसर देण्याची एक वहिवाटीची वाट म्हणजे हा 'शिवराज' चा शिवसुंदर अंक. तो तुमच्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे.

या वाटेवर एक एक जिप्सी तुम्हाला भेटेल, तो तुमच्या परिचयाचाच असेल— या वाटेवरून जाताना शेपटीच्या झुपक्याने खारी तुम्हाला खुणावतील. झाडे पानांच्या हातांनी बोलावतील. नसेल झगमगाट. ना दिसायचा थाटमाट. ही आहे दूरात जाणारी जवळची पाऊलवाट. हा एक एक जिप्सी टाकतो आहे पाऊल. चुकत माकत. कदाचित याच वाटेवर असेल त्याच्या स्वप्नाची रम्य पहाट !

कौतुकानं, आदरानं लडिवाळ भावजीवानं या पहाटेची पूजा व्हावी, नव्हा-ळीच्या नवागत किरणाचं कौतुक व्हावं, हीच प्रार्थना !

**सर्मपित जीवनाचे**
**कर्तव्यनिष्ठ काका :**

या शिवमंदिराचे संस्थापक आहेत व्ही. टी काका. "एकच ध्यास! एकच आस, ताराराणी विद्यापीठ, मौनी विद्यापीठ आणि शिवराज कॉलेज" आता अन्य कशा-चीच आसक्ती नाहीं. संसारिक पाश नाही. अफाट मिळवलं. बेफाट देऊन टाकलं. सारी जायदाद समाजाची करून टाकली. शिक्षणकार्यं हेच उर्वरीत जीवित. राज-कारण केलं, शिक्षणासाठी. अधिकारपदं वापरली, शिक्षणासाठी. तन मन धन वेचलं शिक्षणासाठी. आज तरी शिक्षण कार्याशिवाय अन्य अवधान नाही.

ईभे बीठलु । उभे बीठलु ।।
बिठु बिना । संसार नही ।।

अशी मुमुक्षू आर्त आळवणी उरली आहे तो शिक्षणाची.

Scanned with CamScanner

हां. आणखी एक त्यांची तळमळ आहे. खरं तर होती; करवीर राज्य संस्थापिका ताराराणीचं स्मारक तिच्याच राजधानीत नाही, ही काकांची खंत. अर्थात हे जिवंत स्मारक ' ताराराणी विद्यापीठामार्फत ' त्यांनी उभारलंच आहे. या कला नगरीत तिचा एकादा पुतळाही नसावा काय ? त्यांनी तेही पार पाडलं. ताराराणी विद्यापीठाच्या दर्शनी प्रांगणात त्यांनीच उभविलेला नयन मनोहर बगिचा त्यांनीच उठविला. कारंजा काढला. आणि त्याठिकाणी समरदेवता पुण्यश्लोक ताराबाई महाराणीसाहेब यांचा डौलदार भव्य पुतळा बसवला– त्याचं उद्घाटन ता. २२ फेब्रुवारी रोजी झाले. स्वतंत्र राज्य निर्माण करणारी रणरागिणी ताराराणी आणि तिला वंदन करायला आले, स्वतंत्र राष्ट्र निर्माता विजयी वीर, भारताचा पराक्रमी पुत्र आणि शूर सरसेनानी जनरल माणेकशा !

काकांनी तीन पिढ्या पाहिल्या. संस्थानपिढी. ब्रिटीश पिढी आणि स्वतंत्र पिढी. जुन्यात पाऊल. नव्यात झेप– या माणसात अद्यापी नव्या क्षितीजाची धग आहे. हाडा पेरात मुरब्बी रग आहे. आता उरा ओठात एकच जाग आहे. एक एक पुढे यावा. पणतीला पणती पेटवावी. लाख लाख ज्योती पाजळाव्या. काकांनी पहिली पणती पेटविली आहे. तरुण तरुणी, युवायुवती या इथं.

या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा ।
हिच्या संगाने जागू द्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा ।।

## जिद्द जिवाची : हद्द संयमाची
## प्राचार्य अं. दि. माडगूळकर :

काकांची गुणग्राहकता मोठी. गुणी असून भागत नाही. गुण जाणणाराही गुणवंत असावा लागतो. तरच त्याचं चीज. एका गुणवंतानं केलेली गुणी निवड म्हणजे प्राचार्य अंबादास माडगूळकर. माणूस मोठा जिद्दीचा. स्वीकृत कार्यात सर्व शक्तीनं उभा राहणारा. रसिक दिलदार. माणदेशच्या मातीनं महाराष्ट्राला तशी अनेक माणकं दिली. ती मातीच लोकोत्तर असावी. त्यातही माडगुळी माणसं मनानं मोठी, दिलानं दिलदार. गुणपूजनाच्या वेळी वा आदर अर्पणाच्या प्रसंगी या माणसाच्या मनाचं माधुर्य मोजून घ्यावं. विद्वत्व, वक्तृत्व, कवित्व, आणखी काय मागायला हवं होतं या माणसानं ? गेली तीन वर्षे अत्यंत कुशलतेने माडगूळकरांनी महाविद्यालयाची धुरा वाहिली आहे.

## शिवाच्या मंदिरी
## विद्येचे पूजारी :

प्राध्यापकांच्या इथल्या एकतेला खरोखरच दृष्ट लागावी. प्रसन्न, उत्साही, माणसं. विद्वत्ता, व्यासंग आणि अध्यापनातला अधिकार. असं असूनही जवळजवळ सारेच विद्यार्थी जगतात आणि ग्रामपरिसरात समरसणारे. येथे अनेक वर्षांच्या

Scanned with CamScanner

अध्यापनाची शिदोरी असणारे अनुभवी आहेत. डॉक्टर आहेत, निष्णात वकील आहेत, नामांकित चार्टर्ड अकाऊंटंट आहेत. एम्. ए.; एम्. कॉम. सारी विद्वतसभा. पण जडत्व नाही. कसं हसत हसवत. प्रसन्नतेचा कारंजा उडवीत, स्टाफमध्ये कधी कुणी डोकावून पाहावं. सालसता, सहजजात साधुत्व, दिलखुलास रसिकत्व, चोखंदळ सहृदयत्व-- कधी धडाधड शब्दप्रहार, फडाफड् वाक्ताडन्- अर्थात हे वैचारिक द्वंद्व 'विचारविमर्षिणी'त विद्वत्तेला, बुद्धिवैभवाला मुक्त संचार. तिथं कुणाचा निबंध वाचला जाईल, कुणाच्या पुस्तकावर चर्चा झडेल. हे सारे केवळ "वाचीवीर" नाहीत, वाणी ही तर यांची देणगी, त्यांचे वरदान. पण खेड्यापाड्यात फिरणं, शाळा संमेलनातून सहभागी होणं, नवा विचार-नवी वाणी झोपडीपर्यंत पोचविणं, 'विद्यापीठ ते खेडे' असे अनुसंधान साधणे, शिक्षणाबरोबर समाजसेवेतही रस घेणे असा कर्तव्यतत्पर आणि समाजाभिमुख दृष्टीचे कितीतरी प्राध्यापक या महाविद्या-लयात आहेत. राष्ट्रीय जागृती, संरक्षण, जनजागरण, लोकशिक्षण यासाठी ही मंडळी वेळोवेळी यथाशक्य प्रयत्न करीत असतात.

महाविद्यालयाला स्वतःची इमारत नाही. परवा संस्थेच्या अध्यक्षांनी आवा-हन केल्यावरून प्रत्येक प्राध्यापकांनी आपल्या एका महिन्याचा संपूर्ण पगार इमारत निधीसाठी आनंदाने दिला आहे. येथे लेखक-नाटककार-कवी आहेत. चित्रपट निर्माते आहेत. अभिनय निपुण कलावंत आहेत. फर्डे वक्ते आहेत. सारे निष्ठेने, विनम्र भावनेने इथं आपला स्वीकृत धर्म नेक इमानीपणाने सांभाळत असतात.

## ग्रामीण भागात मोठे महाविद्यालय :

फक्त आर्टस आणि कॉमर्स शाखेतच आज सुमारे पावणे सातशे मुले आहेत. स्वतःची इमारत, विज्ञान शाखा झाल्यास ही संख्या सहज हजार पंधराशेला पोचेल यात शंका नाही. दोन्ही शाखेचा निकाल सतत ७० ते ८८ टक्क्यापर्यंत आहे. ग्रामीण भाग असूनही येथे सुमारे ६०००० रु. किंमतीची पुस्तके असलेले सुसज्ज ग्रंथालय आहे. दैनिके, मासिके इ. ची संख्या सुमारे २० आहे. मुलांची एन्. सी. सी. तशी खास मुलींचीही एन्. सी. सी. आहे. ग्रामीण भागात मुलींची एन्. सी. सी. असणारे हेच एक एकमेव कॉलेज असावे.

मुलांच्या गरजा अडचणी निवारण्यासाठी नेहमीच्या सर्व सरकारी निमसर-कारी सवलती खेरीज पुस्तके, खोलीभाडे, बसपास, परीक्षा शुल्क, सत्र फी इ. अनेक प्रकारे विद्यार्थ्यांना साहाय्य केले जाते. यासाठी प्राचार्य नेहमीच आत्मीयतेने लक्ष पुरवतात.

## गाठी भेटी : सांस्कृतिक गोष्टी

या अभ्यास वर्षात राष्ट्रपतीपदक विजेते गुरुवर्य शं. तु. देसाई, डॉ. बाबा आढाव, कविवर्य नारायण सुर्वे, कविवर्य डॉ. सूर्यकांत खांडेकर, भूपाल जंगले, जनार्दनपंत भोसले, मौनी विद्यापीठाचे कार्यकारी संचालक मा. माळीसाहेब, डॉ.

Scanned with CamScanner

गुणे, प्राचार्य कदम इ. नी महाविद्यालयाला भेटी दिल्या. काव्यवाचन, व्याख्याने, अनुभव कथन, चित्रदर्शन असे कार्यक्रम झाले. आमच्या कलापथकाने गारगोटीच्या मौनी विद्यापीठातही एक देखणा कार्यक्रम केला. काकांच्यातर नेहमी भेटी असतात.

—बांगला जागरण मिरवणूक, प्रचारसभा, विजयानंद असेही कार्यक्रम झाले. एक सैनिक व एन्.सी.सी. इन्स्ट्रक्टर श्री. टक्केश्वरनाथ यांचे युद्ध विषयावर एक व्याख्यान झाले. ते स्वतः चीन, पाकिस्तानशी १ ले युद्ध, गोमंतक मुक्तीयुद्ध यात होते.

**संचयिका : महाराष्ट्रात १ ली:**

युद्ध सुरू झालं. तरूण देशभक्त रक्ताला आव्हान आलं. विद्यार्थी त्यागाला सिद्ध झाले. युवा मनात वीरश्रीला आव्हान आले.

हिच्या कुशीत जन्मले
काळे कणखर हात
ज्यांच्या दुर्गम धीराने
केली मृत्यूवर मात

—या परंपरेत जन्मलेलं मराठी मन स्वस्थ कसे राहील ?

सह्याद्रीवर अवतरलेल्या
ऊर्जस्वल स्वातंत्र्य उषेची
इथे लागली
पहिली चाहुल

आणि मग पाऊल जमू लागले. राष्ट्राच्या हाकेला प्रतिसाद देण्याच्या प्रतिज्ञा होऊ लागल्या. लौकरच आम्ही जिंकलो. युद्ध थांबलं, विकास कसा थांबवता येईल ? राष्ट्रपतींनी अल्पबचतीचे आवाहन केले. शिवराज महाविद्यालयाने महाराष्ट्रात १ली विद्यार्थी संचयिकेची सुरवात केली. पहिला मान पटकावला. मा. कलेक्टर श्री. कृष्णकुमार उप्पल यांनीच 'महाराष्ट्रातले पहिले महाविद्यालय ' अशी घोषणा करून शिवराजचा गौरव केला.

**शुभास्ते पंथानाः**

यंदा तृतीय वर्ष 'वाणिज्य आणि मानव्याच्या' चार शाखा मराठी, हिंदी, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र, पदवी परीक्षेचा अभ्यास करणारे आता दूर जाणार. चार वर्षे ते या शिवालयात वाढले, हसले, रुसले, रागलोभ दिला घेतला. ज्याचा शेवट गोड ते सारेच गोड. मित्रहो, तुम्ही पहिल्या वर्षी लाजऱ्या बुजऱ्या नेत्रानं, धीरअधीऱ्या मनानं या प्रासादात पाऊल ठेवलंत. येताना प्रसन्न खळाळ, नितळ आभाळ घेऊन आलात. त्या ' हिरव्या तृण पात्याचे स्वागत सत्कार करताना आनंद होता. आता नव्या सृजनाची अद्‌भुत प्रेरणा घेऊन जाणाऱ्या आपाढ घनांकडे बघून गहिवरतं. तुम्ही जाणार आहात ---- आणि हे असेच होत राहाणार आहे. 'अशी पाखरे येती । आणिक स्मृती ठेवुनी जाती ॥ ' हेच खरं. पण तुमच्या स्मृतीच आम्हाला अधिक गोड वाटणार आहेत.

तुझसे तेरी याद अच्छी है जो आनेको शर्माती नही ।
तू आके चली जाती है और वह कभी जाती नही ॥

—चंद्रकुमार नलगे.

# श्रेय नामावली---

## ● मराठी विभाग-

जी. आर. मेंडगुदले; शांता सोलापुरे; एस्. एस्. चौगुले; आ. स. शिंदे;
आर. वी. वांगणेकर; बी. डी. पाटील; सूर्यकांत घुगरे; निजगुणी स्वामी;
बी. एम्. इक्के; शिवाजी गोकाककर; विद्या सावंत; आशा भूतकर.

पी. एस्. येजरे; बा. दा. पाटील, बी. व्ही. कुंभार; ज्योत्स्ना आसगांवकर;
कु. एस्. व्ही कुलकर्णी; मुबारक मकानदार; अे. अेम्. शिंदे; अनामिका;
ए. टी. पाटील; अशोक पट्टणशेट्टी.

## ● हिंदी विभाग-

ए. एस्. शिंदे; सूर्यकांत घुगरे; एस्. बी. कडूकर; कु. बेकनाळकर;
ज्योत्स्ना आसगावकर; एस्. बी. पवमचे; एस्. बी. कडूकर; एस्. एस्.
फलटणे; एस्. बी. बेकनाळकर.

## ● ENGLISH SECTION-

N. M. Pirapagol; S. S. Chougule; A. S. Shinde; S. Ghugary,
Miss S. J. Solapure; A. S. Pattanshetti; B. M. Mohite.

Scanned with CamScanner

मुद्रण– भारती मुद्रणालय, पाचवी गल्ली, शाहूपुरी, कोल्हापूर.

Statement about ownership and other particulars about newspaper 'Shivraj' Miscellany of Shivraj Mahavidyalaya, Gadhinglaj to be published in the first issue every year after last day of February.

## Form No. IV (Rule No. 8)

| | |
|---|---|
| Place of publication | Shivraj Mahavidyalaya, Gadhinglaj |
| Periodicity of its publication | Annual |
| Printer's Name | S. R. Shipurkar |
| Nationality | Indian |
| Address | 824 E, Shahupuri, Kolhapur |
| Publisher's Name | Prin. A. D. Madgulkar |
| Nationality | Indian |
| Address | Shivraj Mahavidyalaya, Gadhinglaj |
| Editor's Name | Prof. Chandrakumar Nalage |
| Nationality | Indian |
| Address | Shivraj Mahavidyalaya, Gadhinglaj |

I, A.D. Madgulkar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Gadhinglaj

**A. D. Madgulkar**
Signature of Publisher

Scanned with CamScanner

सन्माननीय काकांचा
वाढदिवस साजरा होतो तेव्हा . . .

→





←

प्राचार्य माडगूळकर, डॉ. मोळदी,
यांच्या समवेत मा. व्ही. टी. पाटील
तथा काका.

मा. काका उत्तरादाखल
बोलत असताना

→



Scanned with CamScanner

# पूजा मांडतो गुणवंतांची....

डॉ. सूर्यकांत खांडेकर यांचा
पीएच्. डी. मिळालेबद्दल व
मा. देसाई गुरुजीना
राष्ट्रपती पारितोषिक
मिळालेबद्दल सत्कार.

→





←

अग्रगण्य अभिनेता चंद्रकांत मांडरे व
प्राचार्य माडगूळकर

डॉ. गुणे परदेशच्या दौऱ्याहून
परतल्यानंतर...
(अध्यक्षस्थानी मा. व्ही. टी. पाटील)

→



Scanned with CamScanner



## मराठी विभाग

### अखंड राहू

जय जवान, जय किसान
भारत मातेस देऊ प्राण ।।धृ।।
भारत माता आम्हां वीरांची
आम्ही लेकरे त्या प्राणाची
आपुली शक्ति करुया खर्ची देवूनिया बलीदान १

कित्येकांनी प्राण अर्पिले
माते आपुल्या स्वतंत्र केले
तन, मन, धन अर्पून आम्ही करू तिचे रक्षण २

स्पर्श हृदयी शत्रूचा होता
भ्रष्ट होईल आपुली माता
लढा, मोडा शत्रूशी मनी भावना एकीची ठेवून ३

द्वेष मत्सर ना विपन्नता
माते पोटी सदा समानता
ठेई ग्वाही तिरंगा आमुचा फडफडत राहून ४

बंधूभावाने सदा राहते
ज्ञानामृत हे सर्वा पाजिते
त्रिखंडात या अखंड राहूं असेच आम्ही गर्जून ५

मेंडगुदले जी. आर.
प. पू. कला 'अ'



## निळसर स्वप्न

काही वेळा मी स्वप्नात
रमून जाते
पण ते स्वप्न असते जागेपणीचे
स्वप्नात मला मिळतात
दोन सोनेरी पंख
उडून जाते मी निळाशार
आकाशाकडे...
अथांग, अनंत आकाशांत
उंचच उंच भराऱ्या घेते
सर्वत्र निळसर निळसर...
निळ्या जगाचा अनुभव
चाखून पाहते,
निळे निळे निळसरच दिसते...
स्वप्नात वाटते...
जीवनाच्या या स्वप्नाचा या
स्वप्नातच व्हावा अंत...

**कु. शांता सोलापुरे**
द्वि. व. कला.

## 'कविता'

मी लिहितो कविता
वाचतो कविता
अन्–
बघतो कविता !
शब्दा शब्दाची रचना
कशी आहे ती सुचेना
खाईन तेही पचेना
चित्त नाही वाचता ।।१।।
'अलंकार' कसे हे फिके
मन हे तुजसाठी भुके
लोक मजवर कां न थुंके
तुला पाहता अन् पाहता ।।२।।

**एस्. एस्. चौगुले**
रि. व. कला.



## स्वप्नात मी....

स्वप्नात बांधतो सुंदर बंगला
समोर हसरा सागर निळा ।
रोज बदलतो माझा बंगला
स्वप्नात मी झालो खुळा ।
येते कधी चिमुकली एक लाट
देते मान आगळाच थाट ।
बघता बघता बंगल्या भो ती
सुंदर हिरवी हिरवळ उगवती ।
गवत हिरवे फुले रंगीत
गात राहतात वेगळे संगीत ।
कधी निळे, कधी जांभळे
कधी हिरवे तर कधी पारवे ।
स्वप्नात बागेत मी टाकतो पाऊल
टोचतो काटा, संपते भूल
बागेतलं इवलसं चिमुकलं फूल ।
नाहीसं होताना सांगतं मला
हा बंगला स्वप्नातला ।
(तू देखील स्वप्नातलाच)

**आ. स. शिंदे**
प्र. व. वाणिज्य



# ओवी

पयली माजी वोवी चंद्रभागचा पयला पाया
वसली पंडरी धन तुमची यिठूराया

दुसरी माझी वोवी चंद्रभागचा अखायोर
देवा त्या यिठलाचा हाय पाण्यात मक्कायोर

तिसरी माजी वोवी वोवी गायीली तिन्ही देवा
ब्रह्म यिसणू सदासिवा

चवथी माजी वोवी दरड खांबाला तटईली
इठ्ठल रुकमाई दोग साक्षांत भेटईली

पाचवी माजी वोवी पाचव्या पांडवाला
नटव्या वंदूजीचा योल जावूंदे मांडवाला

सहावी माजी वोवी सावंत माळयाईला
फूलाचा ह्योग हार यिठू देवाच्या गळयाईला

सातवी माजी वोवी वोवी गायीली सातांईला
देव गोरख नाथांईला

आठवी माजी वोवी वोवी गाईली अष्टपाळ
कृष्ण गोकुळी तान्हवाळ

नववी माजी वोवी नवी अवतार
जानवा तुकाराम न्हाई केलाय संवसार

धावी माजी वोवी नामदेवाच्या पाययीशी
यिठू देवाची भेट घेतो घेतो वाहेर राऊईळी.


प्रा.
आर. बी. वांगणेकर
प. पु. वाणिज्य

## माणूस

मी एक माणूस
तुझ्यासारखा, त्याच्यासारखा–
या सर्वासारख्या
स्वतःच अस्तित्व स्वतःच्या अस्तित्वात हरवणारा
शुन्याच्या परिघात....
गुरफटणारा....
बाहेर पडण्याला धडपड नाही.
व्यासाच्या क्षीतिजरेषात गसावतो -----
हाताच्या त्रिज्यानी स्वतःला जखडतो–
नाही भावना– नाही रंग. नाही रुप–
नाहीत मनाच्या उभारी
बंड करायला धजावत नाही मन
जगाचा अव्यापारेषू व्यापार मला पेलत नाही.
मला वाटतंय् मी आहे एक माणूस
पण जगाच्या हिशेबी.... ?
माणूस मात्र मी...

**बी. डी. पाटील**
द्वि. व. साहित्य

## कळी

धुंद आकाशात
मंद मंद वाऱ्याची झुळूक
नदिकिनाऱ्यावरती.
चंद्र अन् तारे मावळले
रम्य पहाटे,
हळूच पसरत होती सूर्याची किरणे..
दवात भिजलेली पाखरं,...
गाण्याच्या तालावर ।
हिरव्या पांघरुणात...
मस्त दडलेली कळी,
ती तर......
उमलण्याच्या वाटेवर ।

**निजगुणी स्वामी**
तृ. व. कला.



## भोवरा

तू तुझ्याच नटव्यात ----
तुझ्याच थटव्यात
धुंद–भाव–गंध उधळीत
अन्
रात्र धुक्यात ----
भोवऱ्यात
व्यथेच्या सागरात
दिलेस लोटून ----

**सूर्यकान्त घुगरे**
द्वि. व. साहित्य.

Scanned with CamScanner

## अशी वाटतेस

डोळे तुझे वाटती
तारे निखळले नभीचे
ओठावरी तुझ्या त्या
मधु हास्य चांदण्याचे
छोटया तुझ्या कपाळी
जीवनाचे रस्ते दिसती
मुखावरी तुझ्या त्या
गोड प्रीत उमटती.
गाल तुझे भासती
चंद्राने केले खळे
जीव माझा तुझसाठी
विसरु नकोस भोळे

**क्के बी. एम.**
प्र. व. वाणिज्य



## वलय

किरण भेदून जात होतं
तोच पाण्याच्या हृदयाशी
हितगुजणारे तरंग
उठले लाख लाख ---
क्षितिजाच्या खाली
सूर्याच्या साक्षीने
देत होती मासोळी गोल वलये,
पाण्यावर चीर पडत होती
फोड उठत होते ---
पण नव्हती जाण --- पुन्हा अजाण ---
आसमंताखाली संथ उधाण,
बिचारे पक्षी समजावीत होते,
लवलवत्या पंखानी जखम शेकत होते,
चिवचिवत्या वेदनांनी दु:ख शोषित होते
अशाच वलयांची गर्दी ---
मानवतेच्या हृदयात ---
दु:ख घोटीत असतात ---
बिचाऱ्या आसमंतात.



**शिवाजी गोकाककर**
द्वि. व. साहित्य

Scanned with CamScanner

## कोण असावी अशी मृणालिन !

कोण असावी अशी मृणालिन !
आनंदाच्या उन्मादाने
हसती, डुलती, छम-छम करीती,
जसे गिरिशिखरावरुनी
धारा तव ही अवतरते,
अशी ती मज गमे अवखळ सरीता !
कोण असावी अशी मृणालिन !
रंगीबिरंगी वस्त्र तनुवरी,
रुप सावळे, पण मंगलदायी,
सुखशान्ति, विश्रान्तिचा भाव प्रगटे तिच्या
मुखावरी
कोण असावी अशी मृणालिन !
वात्सल्याची असे गायत्री,
तिच्या मुखावरी अविरत झळके,
श्रमसुखरत निष्पाप
आणि आम्हा सर्वा कुरवाळे पक्ष्यापरि !
कोण असावी अशी मृणालिन !
जिच्या मुखावर अविरत राहे,
सौख्य, समाधान आणिक तृप्ति
आणि विश्वकुटूम्बक वृत्ति !
अशी ती मंगलमूर्ति मज गमे,
आकाश माऊली !

**कु. विद्या ग. सावंत**
प्र. व. कला



## कळेल प्रीत का रे ?

कळेल का रे तुला
मम प्रीत ही कवी रे ॥धृ॥
तुझ्या दर्शना भुकेली
ही सुंदरी निघाली
जरी नजर भेट झाली
तरी उमजेल तुला सारे ॥१॥
तुझी दृष्टि ही प्यारी
रंगवील सृष्टि न्यारी
घुमवील कडे कपारी
भुलशील तूही का रे ॥२॥

**कु. आशा थों. भूतकर**



# "परत न येण्यासाठी"

-येजरे पी. एल.
प्र. व. साहित्य

सायंकाळची कातर वेळ होती. सहाचा सुमार- मे अखेरचे. दिवस. धडधार पाऊस. वाऱ्याची झुळूक हेलकावे खात होती. आकाशाच्या रंगमंचकावर विजेचे तांडवनृत्य चालले होते. विजेचा कडकडाट अन् ढगांचा गडगडाट अवकाशाची पोकळी दुमदुमून टाकीत होता. किसानी पाखरे पावसाच्या भीतीने घरट्याकडे परतत होती. गाई-वासरे घरच्या ओढीने हंबरत उड्या टाकीत येत होती. अधून मधून लहान लहान पाव- साच्या सरी रिमझीमत होत्या. तर अधिमधी लहान जलबिंदूचे तुषार उडत होते. पश्चिमेचे भूर वारे फुलांचा परिमल दरवळत बेफाम सुटले होते. उगवतीचा पुनवेचा चंद्र मावळतीच्या सूर्याला लवकर बुडण्याचा इशारा देत होता.

टेकडीच्या उतारावर असणाऱ्या झोपडीतून चुली पेटल्या होत्या आणि त्यांच्या धुराचा लोट अवका- शाच्या पोकळीत मंद गतीने विरत चालला होता. गल्ली-बोळातून घरादारातून स्त्री–पुरुषांच्या कुजबूज- ण्याचे आवाज उठत होते. प्रत्येकाच्या मुखातून मोहनच्या जीवन चारित्र्याचे बोल निघत होते, —— आज तर त्याच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला होता – काही तरी अघटित घडलं होतं.——

उगवतीला पुनवेच्या शीतल चांदण्यात मोहन एकटाच निश्चित बसला होता. आजपर्यंत तो असा अनेकवेळा नूतनच्या समवेत बसला होता. परंतु आजची



Scanned with CamScanner

त्याची मनःस्थिती फार वेगळी होती. त्याच्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं-मस्तकाच्या वारुळात अनेक प्रश्नांच्या भुंजगानी फणा उभारला होता-- तो त्याला हाणून पाडावयाचा होता--पण--?

पण--, सहा महिन्यापूर्वी मोहननं नूतनशी लग्न केलं. पण हे लग्न मोहनला पसंत नव्हतं. त्याच्या-मनाविरुद्ध हे लग्न झालं होतं. पण त्याला त्याचा नाईलाज झाला होता. कारण घरच्या दडपणाखाली मोहनला लग्न करणं भाग पडलं होतं. त्याचे वडील करारी होते तद्वतच स्वतःचच घोडं पुढं दामटणारे होते. त्यामुळे मोहनचा नाईलाज झाला होता. परंतु तो पूर्णपणे जाणून होता की- आपण एक गरीब--पामर-यःकश्चित माणूस एका घरंदाज मुलीशी लग्न करून तिच्या जीवनाची बरबादी होणार--- तिच्या सुखी जीवनाची दुर्दशा होणार. पण-- पण ती वेळ आता निघून गेली होती.

लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी हे उभयता वधूवर मधुचंद्राला म्हणून बाहेर पडले होते.

" कुठं जायचं ?" हळूच नूतननं प्रश्न केला.

" राजमाच्या पॉईंटवर-!"

अं-हं-! नूतननं नकारार्थी मान डोलवली.

" -कां-?"

" खरं सांगू कां ? आज मधुचंद्राला जायच नको आणि कदाचित येथून पुढे केव्हाही मधुचंद्राला जायचं नाही, किंबहुना शरीर संबंध देखील ठेवायचे नाहीत-!" नूतन त्याच्याकडे न बघताच म्हणाली.

नूतनच्या प्रत्युतराने मोहनला भोवळ आली. त्याला आपल्या पायाखालची जमीन दुभंगत आहे असे वाटू लागले--सभोवतालचे वातावरण धुसर भासू लागले--त्याला एकदम आश्चर्याचा धक्का बसला. तिच्या अनपेक्षित उत्तराने त्याला काय प्रत्युत्तर करावे हेच सुचेना.

-शेवटी कंठात जोर आणून मोहन म्हणाला, "-कां बरं ?"

" ऐका-प्रथम माझं ऐका !- मधुचंद्राला जाण्या-पेक्षा आपण आता एकांतात कुठं तरी जाऊ या- मला तुमच्याशी काही महत्वाच बोलायचंय-' गंभीर आवा-जात नूतन म्हणाली.

" ठीक आहे-!" नाराजीच्या स्वरात मोहनने होकार दिला अन् तिला घेऊन तो एका निर्जण ठिकाणी चालू लागला.

मोहन जरा चरकलाच होता. कारण काल लग्न झालय-- जरा सांभाळून घेतलं पाहिजे- जन्म-जन्मांतरिची ती सोबतीण आहे म्हणून जरा सांभाळून घेतलं पाहिजे. नाही तर उगाच आपल्याबद्दल तिच्या मनात गैर समज व्हायला नको--

-मधुर शीतल चांदण्यात उभयता एका वाळूच्या ढिगाऱ्यावर समोरासमोर बसली. चंद्राच्या शुभ्र चांद-ण्यात-- ह्या एवढ्या विशाल निसर्गात हे नव दांपत्य बसलं. चंद्राच्या प्रकाशात मोहनच्या चेहऱ्यावरील गंभीरता स्पष्ट दिसत होती. तरी पण तो कांहीच झाले नाही असा उसना आव आणून भासवीत होता. पाच मिनिटं गेली- परंतु कोणीच कांही बोलेना. शेवटी नूतननेच शांततेचा भंग केला.

" मोहन- प्रथम मी तुमची क्षमा मागून तुम्हाला सर्व सांगते-! मला तुम्हाला कांही फसवायचं नाही- म्हणून प्रथमच मी माझ्याबद्दल सांगते-!"

मोहन जरा सावरून बसला. कारण हे नवीन बोल मोहन आज तिच्या तोंडातून नवीनच ऐकत होता नजर वाळूच्या ढिगाऱ्यावर वळवून कानाची दिशा तिच्या तोंडाकडे करून तो निश्चितपणे ऐकत होता. कांही अघटित-- भयंकर घडणार हे तो जाणून होता

नूतन पुढे बोलू लागली-"आपलं हे लग्न तुमच्या विरूद्ध झालं आहे तद्वतच माझ्या देखील मनाविरुद्ध झालं आहे. तुम्हाला कदाचित कल्पना नसेल, पण माझ्या आईच्या विरूद्ध जाण्याची माझी प्रज्ञा नव्हती. तेव्हां घरच्यांच्या मर्जीने हे लग्न झालंय-! बाबा ह्यात असते तर त्यांनी केव्हाच याला आळा घातला असता-परंतु आईच्या पसतीला तुम्ही उतरला म्हणून माझी पसती नसतांना देखील आईच्या अन् भाऊच्या जबर-दस्तीनं मला तुमच्याशी लग्न करणं भाग पडलं- प्रथम

Scanned with CamScanner

मी पुष्कळ विरोध केला, पण माझं कोणीच ऐकेना– घरची गडगंज संपत्ती असून देखील मला तुमच्याशी सुखी राहणं–तुमच्याशी जीवन कंठन अशक्य आहे कारण माझं एका तरूणावर प्रेम होतं आणि ते अजूनही आहे. ते निस्सीम आहे, उदात्त आहे, शाश्वत आहे, तद्वतच ते चिरकाल टिकणारं आहे. म्हणून तर मला तुमच्याशी संसार करणं अशक्य आहे एकदा तर आमचं हे प्रेम प्रकरण भाऊच्या कानावर पडलं अन त्यांनी मला फोडून काढलं–घरातून बाहेर पडण्यास मनाई केली. परंतु तरीही आम्ही चोरून एकमेकांना भेटतच होतो. पण आता आपल्या लग्नामुळे मी बंध–नात पडल्यासारखी झालेय– खरं सांगू कां ? मला हे बंधन नको आहे. या बंधनात राहून मी सुखी होणार नाही. किंबहुना तुम्हालाही स्वास्थ्य मिळणार नाही. कारण मी मनाने, अतःकरणाने इतकेच काय पण शरी-राने देखील मी केव्ह.च त्याची झालेय–!"

–इतके बोलून नूतन त्याच्या प्रत्युत्तराची वाट पाहू लागली.

पण इकडे मोहन विषण्ण अवस्थेत होता. त्याच्या डोक्यात विचाराचं काहूर माजलं, त्याची मनोरथं फोल ठरली होती–कल्पनेची भरारी थिट्टी पडली होती– त्याचं सुंदर सुखस्वप्न भंग पावलं होतं अन् तिच्या या वृत्तीन त्याच्या सुखस्वप्नाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या होत्या. त्या प्रत्येक ठिकरीतून त्याचं भेसूर स्वप्न त्याच्याकडे डोकावून पहात आहे असे वाटत होते. मोठ्या परिश्रमाने त्याने जीभ टाळ्याला लावली– आवाज जड झाला, कंठ शुष्क पडला आणि मोहन क्षीण आवाजात म्हणाला,––

"– मग एवढं होत तर लग्न तरी कशाला केलंस–?"

"सांगते ऐका !" कंठ साफ करीत नूतन धीरानं म्हणाली, तुमचे बाबा आणि माझी आई ही सख्खी बहीण भावंड–आईची फार मनीषा होती की आपल्या नूतनचं लग्न भावाच्या मुलाशी व्हावं, आपली संपत्ती मुलीच्या लग्नामुळं तरी आपल्या गरीब भावाला मिळावी आणि त्यानं अखेरचे चार दिवस सुखात घालवावेत पण–'

इतका वेळ शांतपणे ऐकत बसलेला मोहन कदा-चित उफाळून उठेल अशी तिची अपेक्षा होती. परंतु तिला त्याचे फारच आश्चर्य वाटले. मोहन शांतपणे म्हणाला,–

" ठीक आहे– पुढं काय ?"

आता मात्र नूतन एकदम आश्चर्य चकित झाली इतका वेळ शांतपणे ऐकत बसलेला मोहन हे ऐकून गप्प कसा बसला ? तिला वाटलं होतं की हा आकाश पाताळ एक करील ––– मोठमोठ्यानं ओरडून मला या कृत्याचा जाब विचारील. मला तू फसवलस याचा अर्थ काय ? या प्रश्नाला तिचं उत्तर नव्हतं. फक्त एकच काय ते उत्तर होतं आणि ते म्हणजे तिला त्याचा नाईलाज आणि घरच्यांची जबरदस्ती–!

मोहन गंभीर झाला होता. त्याने विचारले, " नूतन, तुला मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे बंधनात ठेवली नाही तर तू स्वैर होशील आणि तू तुझ्या प्रियकराशी लग्न करून पळून जाशील. माझ्या नावाला काळीमा लावशील- समाजात मला जीवन जगणे कठीण करून देशील- याबद्दलची काळजी कोण घेणार–? कारण सर्वस्वी तूच जबाबदार असणार–! "

"–हो पण तुमच्या नावाला बट्टा लागेल किंवा घराण्याला कलंक लागेल अशा प्रकारचा कोणताच प्रमाद माझ्या हातून घडणार नाही–याचं मी वचन देते !"

" ठीक आहे, पण एक महत्वाचं सांगतो. तुझे अन् माझे हे संबंध माझ्या आईला समजता कामा नये. कारण ती फार हळव्या मनाची आहे. तिने माझ्यासाठी माझ्या शिक्षणासाठी खूप कष्ट सोसले, खूप यातना सोसल्या त्या माझ्या माऊलीला तू हे जाणवून देऊ नकास. नाही तर ती हाय खाऊन प्राण सोडेल. इतकं माझ्यासाठी कष्ट सोसूनसुद्धा तिला व्यर्थ वाटेल, निर–र्थक वाटेल !"

मोहन सद्गदीत होऊन बोलत होता. आपलं अंतःकरण मोकळं करून तो तिला सर्व सांगत होता. त्याच्या प्रत्येक शब्दातून दुःख डोकावत होतं, चेहऱ्यावर असीम दुःखाची छटा उमटत होती. पण तो हे सारे मनातल्या मनात साठवून ठेवत होता. सगळे कांही धीराने, धिम्मेपणाने करीत होता–वालत होता.



Scanned with CamScanner

—इतक्यात कोठून तरी कुजबुजण्याची चाहूल आली आणि ती दोघं सुन्न मन:स्थितीत घरची वाट चालू लागली. दोघांच्याही मनात ह्यावेळी तुफान वादळ माजलं होतं. मनाचे—विचाराचे लगाम बेफाम सुटले होते.

उभयतानी घरात प्रवेश केला होता तो पण अबोलपणेच, पण निर्विकार चेहऱ्याने.

—आणि असाच काही कालावधी गेला. घरात कर्तीसवरती म्हणून नूतनच सर्व पहात होती. मोहन ऑफिसला गेलेला असायचा. कधी जेवायला घरी यायचा तर कधी कधी क्लबलाच जायचा. दुपारच्या वेळी मोहन घरी नसायचा तेव्हा नूतन आपल्या प्रिय—कराच्या आठवणी काढून त्या सुखद गतस्मृतींशी वेळ घालवायची. तेवढाच तिच्या मनाला दिलासा अन् तितकाच विरंगुळा !

संध्याकाळी ऑफिसमधून आल्यावर मोहन आतासे फारसा घरी थांबत नसे. फक्त जेवायला तेवढा घरी असे. अन्यथा क्लब किंवा ऑफिस किंवा मित्रांच्या घरी जाऊन बसे. असं लग्नानंतर रोजच घडत होतं. पण याची कल्पना कृष्णाबाईंना नव्हती. उलट या मोहनच्या तऱ्हेवाईक वागण्याचा परिणाम नूतनला पथ्यावरच पडायचा. कारण मोहनच्या त्या गैर हजरीत ती आपल्या अविनाशला भेटू शकत होती. त्याच्याशी गुजगोष्टी करू शकत होती. आईला कांही वाटू नये म्हणून किंवा तिला संशय येऊ नये म्हणून ती केवळ नाममात्र एका खोलीत झोपत असत. पण त्यांचे झोप—ण्याचे बिछाने वेगवेगळे असत आणि ते एकमेकापासून दूर असत.

—इतके होऊनसुद्धा मोहन कधी तिच्याशी तिर—स्काराने किंवा मत्सराने किंवा कुत्सीत बुद्धीने वागला नाही तद्वतच तिच्याशी कधी तिच्या प्रियकराबद्दल देखील कधी वाच्यता केली नाही. उलट सहानुभूतीची प्रेमळ वागणूक देण्याचा तो प्रयत्न करीत होता.

असेच दिवस निघून जात होते. परंतु यांचा अबोला कधी मिटला नाही की कधी प्रसंगी ती एक—मेकाशी बोलली नाहीत. जणू कांही मौन स्विकारण्याच व्रतच घेतलं होतं ! घरातून निघतांना ती दोघं एकदम बाहेर पडत असत पण पुढे आल्यावर त्यांचे प्रवाह विरूद्ध दिशेस जात असत. आजही नेमकं हेच घडलं होतं. नूतन आपल्या प्रियकराच्या घरच्या वाटेला लागली अन् मोहन— तो कुठे जाणार होता हे त्यालाही माहित नव्हतं. परंतु पाय जिथं पडत होते तिकडे तो वळत होता. तिकडे तो जात होता, परंतु ना पूर्वनियो—जीत स्थळ वा ना ठिकाण पण कुठं तरी जायचं—दूर एका अनामिक ठिकाणी—!

नूतनला आज प्रियकराच्या घराकडून घरी जायला बराच उशीर झाला होता. घरी सासुबाईंनी सर्व झाडलोट करून ठेवलं होतं. चुली पेटवून जेवणाला प्रारंभ केला होता तरी पण नूतनचा पत्ता नव्हता. विचारीनं मनाची समजूत करून घेतली की,— माझ्या मोहनला अगदी मनाजोगी बायको मिळाली आहे तेव्हा गेली असतील कुठं तरी फिरायला—? पण या माऊलीला काय ठाऊक- या आपल्या सूनबाईचं कुटिल कारस्थान. इतक्यात नूतनने घरात प्रवेश केला तो पोष्टमननं पाकिट भिरकावलं. भाऊच पत्र असेल अपेक्षेनं तिनं ते पत्र फोडलं. मात्र अक्षर पाहताच तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. ते पत्र तिच्या प्रियकराचे होतं म्हणून तिनं उत्सुकतेतं वाचण्यास सुरुवात केली प्रत्येक शब्दागणिक तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते—त्यात लिहिलं होतं,—

—नूतन, तुला प्रिय म्हणण्याचा अधिकार आता मला नाही- त्याबद्दल राग मानू नको. प्रथम मी तुझी क्षमा मागतो. कारण—? कारण असच कांहीतरी घडलं आहे— ते तुला मी मघाशीच सविस्तर सांगणार होतो पण तुला तोंडावर सांगण्यापेक्षा पत्राद्वारेच कळविणं सोयिस्कर वाटलं म्हणून लिहित आहे.

—परवा मी दूर एका ठिकाणी फिरायला गेलो होतो- तेव्हा अचानकपणे मला एक गृहस्थ निश्चितपणे बसलेला दिसला. त्याची मुद्रा म्लान दिसत होती त्याच्या हृदयाच्या महासागरात प्रचंड विचारांची खळबळ सुरु झाली होती असं मला वाटतं- कारण त्याच्या चेहऱ्यावर अनेक विचारांच्या अन् अनेक प्रश्नांच्या रेषा उमटल्या होत्या. त्याच्या दृष्टीक्षेपात मी येताच

उठून उभा राहिला आणि जणुं कांही जुन्या ओळखीची मित्र भेटल्याप्रमाणे मला नमस्कार केला. मीही त्याच्या नजदिक जाऊन बसलो. अगदी जुनी ओळख निघाली. बऱ्याच गप्पा झाल्या. माझ्याबद्दल त्याने मला विचारले हल्ली काय करता ? कुठं राहता ? लग्न वगैरे झालं की नाही ? वगैरे वगैरे. हे सर्व ऐकून मी बर्फासारखा गार पडलो. त्याच्याशी काय बोलावें हेच सुचेना. शेवटी काळोख पडू लागला. मी उठलो आणि माझ्या घरी येण्यास आग्रह करू लागलो. परंतु त्यांनी काही शेवटी ऐकलं नाही. अखेर ते तेथे एकटेच बसले. अगदी तपस्या प्रमाणे–! पण नूतन तो गृहस्थ कोण होता माहीत आहे–? तो तुझा नवरा होता–मोहन होता–!'

नूतन, म्हणून मी पुन्हा तुला सांगतो. मोहन खरोखरच देवमाणूस आहे, धीरवान आहे, त्याच्या सहनशीलतेचं कौतुक करावं असंच आहे. किती सहन केलं असेल त्यानं- अगदी हृदयावर डागण्या देऊन बिचारा जगत होता आणि इकडे आपण प्रेमप्रीति साफल्याच्या गोष्टी करत होतो. लग्नानंतरच्या भावी जीवनाचे मनोरथ रचत होतो. पण नूतन, एकवार मोहनच्या जीवनाकडे दृष्टीक्षेप टाकून पहा, की त्या बिचाऱ्याने किती किती हाल सोसले असतील-! कोण यातना झाल्या असतील ! त्याची प्रयत्नांची पराकाष्ठा, त्याचे अतुलमनोबल आणि अपूर्व सहनशीलतेची कमाल मर्यादा तद्वतच त्याचा धीर गंभीरपणा, सहानुभूतीपूर्ण प्रेमळ अंतःकरण, या त्याच्या गुणश्रेष्ठतेकडे तूं पहा अन् मग तुला समजून येईल की खरोखरच मोहन म्हणजे देवमाणूस आहे. त्याला आपलसं केलं पाहिजे. कितीही करून तो माझा धर्मपती आहे, त्याच्याशी माझं जीवन संभवित आहे–! शेवटी नूतन मी हेच कळवू इच्छितो कि तूं त्याची क्षमा माग, त्याला तूं आपलासा कर. कितीही करून तो तुझा पती आहे, जीवनसाथी आहे ! तू मला विसर ! खरंच नूतन तू मला विसर–! माझ्या हातून फार मोठा अपराध घडला आहे की जो मला अक्षम्य आहे त्यासाठी मी पुनरपी तुझी क्षमा मागून– मी तुझा निरोप घेत आहे-तुला सोडून जात आहे–! पुन्हा कधीही न येण्यासाठी-एका अनामिक ठिकाणी जात आहे-! नूतन, क्षमा कर मला-- मी जातो !!

--तुझा एक दुर्दैवी,

**अविनाश.**

पत्रातील प्रत्येक शब्दागणिक तिच्या नेत्रकडा ओलावू लागल्या. आणि पत्र वाचून संपताच नूतन मागच्या मागे धाडकन् कोसळली.

" इकडे मोहन एकटाच एका अनामिक ठिकाणी बसला होता. पुन्हा कधीही घरच्या वाटेला न येण्यासाठी-- अनंतात विलीन होण्यासाठी– या जगाचा कायमचा निरोप घेण्यासाठी– दूर एका अनामिक ठिकाणी निश्चित बसला होता– तो कधीही परत न येण्यासाठी !!!"



# माझ्या पडेल भूमिका....

वा. दा. पाटील
तृ. व. साहित्य



बालगंधर्वासारख्या नटसम्राटानासुद्धा जे जमले नाही ते माझ्या सारख्या सामान्य दोन–अडीच हाताच्या माणसास खुपसं जमलं– आणि तं केवळ पडेल स्त्रीभू–मिका करण्याचं ! बालगंधर्वं केवडे आणि मी केवडा –एवढासाच ! त्यांचं 'अहो देवा' असं काही मला कोणालाही बोलवायची पाळी आली नाही. कारण मला कधीच या नाटकाच्या काळात देवच भेटला नाही, मग म्हणणार तरी कुणाला म्हणा ! !

लहानपणापासून नाटकात कामं करायची खूप हौस. आता ती हौस आहे असं मानणार नाही. तो एक भुर्दंडच मानावा लागेल. कारण आता नाटकात काम करण्यापेक्षा आणि चार प्रेक्षकासमोर येण्यापेक्षा चार दुसरी नाटकं पाहावी असं वाटत.– नुसतं वाटतं हं ! कारण खिसा नेहमीच रिकामा असतो– मग ते दहा दहा रुपये, पहिल्या रांगा, सारीच स्वप्नं– हवेत विर–णारी ! ! मी मनोराज्यं आणि स्वप्नं निषिद्ध मानणारा एक माणूस- तुमच्या सारखाच ! मला माहीत नाही. तुम्हाला स्वप्नं आवडतात की नाही ते ! ! असो. व काय म्हणत होतो मी–? हं. मी रंगभूमीवर कसा आ टलो. आणि प्रेक्षकाना कसा नमस्कार घातला- अग हाताच्या कोपरापासून ! पण 'आम्ही जातो अमुच गांवा' म्हणायची पाळीच आली नाही. कारण म स्टेजवरून कायमचं हाकलण्यात यायचं आणि विना तिकीट रेल्वे प्रवास केल्यावर चेकरने पकडावे. द भरावे आणि एरंडेल प्याल्यासारखा चेहरा करावा तस आंबट चेहरा करून रंगीत थोबाड घेऊन घ परतायचा ! !

चारचौघासमोर अमक्या माणसाचं दिवटं कार म्हणून चमकावं (?) अशा थाटात आम्ही प्रथम भा घेतला नाटकात तो वयाच्या सहाव्या वर्षी–इयत्त दुसरी–आणि नाटक कुठलं तर "गड आला आणि सिंह गेला." पाठ्यपुस्तकात धडा आहे म्हणून मास्त रानी विशेष कार्यक्रम म्हणून बसविला कारण 'आमच

पणं नेहमी पहिला!' हा आम्हांस असलेला धंदा. त्यात मला अर्थात माझ्या त्याकाळच्या चिकन्या सौंदर्यामुळे आणि चेहऱ्यामुळे आईसाहेब- शककर्त्या शिवाजीच्या मातोश्री-जिजाबाईंची भूमिका दिली. आणि ती आम्ही आनंदाने स्विकारली, कारण पुरुषांच्या भूमिका आधिच इतरांनी पटकावल्या. मास्तरांच्या कृपेने!! त्यातली शिवाजीची भूमिका करणारा विद्यार्थी होता मास्तरांचा दिवाणा- मिळमिळीत, बरबटीत चेहऱ्याचे ते पोर!! पण काय तरी म्हणतील मास्तर म्हणून गप्प राहिलो. त्यावेळी मी चिकणा होतो. आताच्या चेहऱ्यावर जाऊ नका हं! कारण दिवसादिवसानी माणसात फरक घडत असतात. तुम्ही कसे असाल ते देवच जाणे- संयुक्त महाराष्ट्राचा मगल कलश घेऊन येणारे शंकरराव देव नव्हे हं! नाही तर आपण काही तरी गैरसमज करून घेणार आणि घोटाळा होणार- सारा समजुतीचा परिणाम समजावयास हवा! बरं असो. आम्ही काय केलं असावं त्यावेळी माहीत आहे का? चक्क जिजाबाईची भूमिका केली. आणि अक्षरश: पडली. आम्हाला आमच्या मास्तरानी आमच्या गुरुमातेचे म्हणजे-त्यांच्या सौभाग्यवतीचं चक्क नऊ वारी पातळ--- सॉरी लुगडं आणून. दिलं. आम्हाला ते कस अंगावर धारण करावं हेच माहीत नव्हतं-आणि ते आमचं वय नव्हतं म्हणाना. हो - कारण दुसऱ्या प्रांताच्या इतक्या खाचाखोचा जाणायला आम्ही काय सी. आय्. ए. चे एजंट होतो! आमच्या शाळेच्याच एका बाईनी ते पातळ नेसवलं आणि चक्क कडकलक्ष्मीच्या अवतारात आमची स्वारी स्टेजवर अवतरली. एका हाताने पातळ सावरीत आणि दुसऱ्या हातानं नाक साफ करीत अस्मादिक बोलणार, इतक्यात पातळाची गाठ निसटली. आणि शककर्त्या शिवाजीची आई-धाडसी गोब्राह्मणप्रतिपालकाची आई-म्हणजे अस्मादिक आत पळालो-कारण समोरचा प्रेक्षकवृंद पाहून आम्ही चाटच पडलो. हो- म्हणता काय? साऱ्या तोंडाची बोबडीच वळली. त-त्-प-प् करीत मला स्टेजवर परत उभा केलं आणि कसातरी स्टेजवर अर्धा तास राहिलो- 'प्रथम ग्रासे मक्षिकापाते' म्हणतात ना-प्रथमच साफ चमनगोटा अगदी कॅरमबोर्डसारखा तुळतुळीत करावा आणि गारांचा वर्षाव सहन करीत घराकडे याव तसाच आमचा अवतार झाला-समजलेत?

ऐकी नाटकांचा असा बोजवारा उडाला. परंतु इयत्ता चौथीत पदार्पण केलं- आणि त्यावेळेला एक काळचाकुळकुळीत दाट मिशाचे एक मास्तर- नावानं काळे, रंगानं काळे आणि अंत:करणाचं काळे पण हौशी काळे आले. आणि आम्ही दररोज कापू लागलो. वर्गात पाय टाकला की आम्ही शाळीग्रामासारखे गप्पगार बसायचो. त्यानी एक नाटक बसवायचं ठरविलं 'वीर अभिमन्यु'!! मी मास्तरांच्याकडे अभिमन्युचं काम करण्यासाठी मागितलं पण त्यानी ते हेडमास्तरांच्या छोटूला दिलं आणि प्रकृतिनियमाप्रमाणे भीमाचं-गंदाधारी काम आलं! तरी नशिबत्रं आमचं, सुभद्रेचं काम आम्हाला मिळालं नाही. आता यावेळी गदा पेलायची होती. धोतर सावरायचं होतं आणि त्याचबरोबर उघडाबंब राहायचं होतं; या साऱ्या कटकटी मी चुकवायचा खूप प्रयत्न केला. पण आमचे मास्तर कसले खाष्ट- म्हणायचे, 'अरे, तुला हीच भूमिका योग्य आहे." ऐन प्रयोगाच्या वेळी आम्हाला त्या मास्तरानीच धोतरं नेसवलं. ते होतं आमच्या पिताजीचं! धोतराला निम्मा मेकअप् लागला होता. पिताजी आता नक्कीच उखडणार हे माहीत होतं. धोतर आणि गदा सावरता सावरता पुरेवाट झाली. काय समजलेत-?

मध्ये तीन वर्षे आमच्या सुदैवानं आणि शाळेच्या दुर्दैवानं नाटकंच झाली नाहीत आणि आमची टिंगल व्हायची थांबली. पण आमच्या दुर्दैवानं परत उचल खाल्ली-. हायस्कूलमध्ये प्रवेश केला- गॅदरिंगचा मोसम आला-आम्हाला आमच्या सरनी सांगितलं, "आम्ही फक्त आंतरशालेय स्पर्धेसाठी नाटक पाठविणार!!" मग आम्ही अगदी स्वर्गात पाऊल ठेवल्याच्या आनंदात नाव नोंदवलं, पण आम्हाला माहित नव्हतं- ते नाटक गॅदरिंगसाठी होणार आहे. एकदा भीमाची भूमिका केल्यानंतर मग निदान खलनायकाच्या साथीदाराची भूमिका द्यावी अशी विनंती केली. पण आमच्या नाटक खात्यानं आमच्या विनंतीला टोपलीची जागा दाखविली. नाटक ठरलं 'राणीचा बाग'! आणि मला नेहमीप्रमाणे नायिकेची 'उमा'ची भूमिका दिली. भूमिका होती एका आंधळ्या बीस-बावीस वर्षाच्या विवाहितेची आणि कुरुप संपादकाची बायको!! सुरूप आंधळी उमा साकार करताना माझा जीव टांग-

णीला लागायचा. गावातलेच एक प्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक, आमचे मुख्याध्यापक आणि इतर शिक्षक आम्हाला सारखा त्रास देत होते–सारखी बैठक–सारखी रंगीत तालीम ! ! माझा जीव अगदी मेटाकुटीस आला होता. उमाचं दुसऱ्या अंकात ऑपरेशन होतं. डोळे येतात. मनोहर खलनायक तिच्या मनात नवऱ्याविषयी गैरसमजूत करून देतो. नवऱ्याची एक लांबची विधवा नातेवाईक असते. तिला मनोहर फसवितो आणि त्याचं बालंट तो उमाकांत- उमाच्या नवऱ्यावर लादतो, आणि स्वतः रिकामा राहतो. आणि याचवेळेला --याचवेळेला मनोहरचा एक नाट्यदिग्दर्शक मित्र उमाच्या घरी येऊन सारी मनोहरची परिस्थिती आणि कुभांड सांगून पितळ उघडं पाडतो. मनोहर येताच त्याचा अपमान ती करते आणि स्वतःचे डोळे फोडून घेते." या प्रसंगावर आधारलेले नाट्य उभं कसं करायचं याची विवंचना आम्हास लागून राहिली.

राहू–केतूसारखे सारेच सरलोक आम्हांभोवती घिरट्या घालू लागले. तालमी रंगू लागल्या-चहा उकळू लागला. आणि बैठकीत काही विनोदी किस्से झडू लागले. त्या नाटकात पहिल्याच अंकात मनोहरना उद्देशून माझ्यासाठी एक वाक्य होतं, "तुमच्या अंगावर शिंपडलेल्या सेंटचा वास किती मधूर आहे हो ?" पण माझ्या तोंडून 'सेंट' ऐवजी 'शेण' असा उल्लेख व्हावयाचा आणि साऱ्या तालमीत एकच हंशा पिकायचा. मनोहरचे काम करणारे आमचे एक शिक्षक या वाक्यावर नेहमीच खूष असायचे आणि 'शेण' असा उल्लेख होताच विचारे एरंडेल प्यायल्याचा अविर्भाव करायचे. आणि एकदाशी आमचं हे नाटक रंगमंचावर गॅदरिंग–निमित्त चढलं– बहुतेक नाटकाच्या मुहूर्ताच्या वेळेलाच वाईट मूहूर्तावर नारळ फुटला असावा. गॅदरिंगसाठी म्हणून एक राजकीय क्षेत्रातील पाहुणे येणार होते. पाहुणे यायची वेळ होती ४–३० आणि ते आले नेहमीच्या वेळेप्रमाणे. रात्री ९–०० वाजता. अगदी वेळेवर येतील तर ते पुढारी कसले आणि मग त्या 'इंडियन टाईम' ला अर्थ तो काय राहणार ! बिचाऱ्यानी कोंबडी घशात घातली आणि ती बिचारी आमच्या नरड्यात रुतून बसली. आणि अस्मादिकांचा आवाज एकदम पार बसला. उखळात पहार बडबावी तसा घोगरा आवाज आमच्या कोकिळकंठातून स्त्रवला. मग काय सांग[illegible] राव ? मजाच झाली. आमची चैन झाली, खडीसाखर काय, लवंग, बडीशेप काय, व्हिक्सच्या गोळ्या काय नायिकेचं काम पडू नये यासाठी सारेच झटू लागले नाहीतर आयत्यावेळेस तयार कोण होणार ? आमचं नशिब त्यादिवशी फळफळेल तसं आता केव्हा फळफळणार याचा अंदाज करणं फार जड जाईल. त्यासाठी लॉटरीची अपेक्षा करावयास हवी. हं, वरं काय सांगत होतो मी– पाहुण्यानी आपलं राजकीय भाषण सुरू केलं आणि समारंभ संपला. ११–३० वाजता पाहुणे आपल्या भाषणात मधून मधून झोपणाऱ्या श्रोत्यांना सांगायचे, " आपण नाटक पहावयास उत्सुक आहात तेव्हा मी थोड्याच वेळात माझं भाषण संपवीन " पण त्यांचं भाषण काही संपत नव्हतं आणि उत्सुक श्रोते शिट्या, आरडाओरड यानी ओपन थिएटर डोक्यावर घेत होते. शेवटी कसंतरी व्याख्यान आटोपून पाहुणे गेले आणि ठीक बारा वाजतां नाटकाला सुरुवात केली. आणि आमच्या नाटकाचे बारा वाजले. कारण माईक बिघडला. प्रेक्षकांचे दोनचार दगड आणि कागदी बाण अंगावर अर्जुनासारखे – सॉरी – विराटनगरीतील बृहन्नडेसारखे झेलले आणि नाटकास सुरुवात झाली. डोळ्यांची उघडझाप करीत मी आंधळ्या नायिकेच्या भूमिकेत स्टेजवर आलो आणि कोणीतरी इरसाल ओरडला, " काय रे बाळ्या, आंधळ्याचे सोंग करतोस ?" हंसू आवरत नव्हतं पण दाबण्याशिवाय गत्यतर नव्हतं. नाटकाला चार अंक होते. तीन अंकानंतर नेहमीप्रमाणे प्रेक्षक निघाले आणि चौथ्या अंकाला प्रेक्षकच नव्हते चार–सहा स्वयसेवक, शिक्षक आणि काही आमंत्रितच राहिले. या प्रयोगाने मात्र मी पुरता जागा झालो. या प्रयोगात आणलेली घरची सुरी, आरसा, ( मेकपसाठी-तोही-आमचाच ) काही कॅलेंडर्स आणि चप्पल आम्हाला मुकली. आणि घरचेजोडे मात्र खाल्ले. काय समजलेत ? घरच्यानी रेडिओचं बटण फिरवावं तसा कान पिरंगळला. आणि नाटकात काम करायच नाही अशी सक्त ताकीद अर्थात जाहीर नोटीस लागली (?).

तरीसुद्धा आमचा हव्यास सुटला नाही. नाटकात काम करण्याची चिकाटी, एकलव्याच्या गुरुप्रतिष्ठेपेक्षासुद्धा खूप दांडगी. यशवंती घोरपड जशी सिंहगडावर



Scanned with CamScanner

चिकटून राहिली तशी नाटकात काम करायची भावना मनात चिकटली ती अजूनही ओसरली नाही. ती धुंदी पहिल्या 'एकच प्याल्या' सारखी अजूनही स्थिर आणि अटळ राहिली आहे.

त्या जाहीर नोटीसीच्या तरतुदीनंतर हायस्कूलच्या गणेशोत्सवासाठी 'पैसे झाडाला लागतात' या तीन अंकी नाटकाचा तिसरा अंक करायचं ठरलं. दिग्दर्शन, निर्मिती, नेपथ्य, संगीत 'सबकुछ' आमचंच. आणि या नाटकात 'कांचन' ची खलनायिकेची भूमिका माझीच. पण या नाटकातला 'दिवाकर' या सहाय्यक नायकाची भूमिका मीच करावी या अटीवर मी कांचनची भूमिका करायला मान्यता दिली. आणि नाटकाच्या बैठकी सुरू झाल्या. कांचन एका श्रीमंत बापाची बदफैली आणि फॅशनेबल मुलगी, मग तिचा वेष, चालणं, वागणं फॅशनेबल असणारच! कांचनची भूमिका संपल्या-दिवाकरचा प्रवेश होणार असतो. त्यासाठी कपडे बदलायला फक्त पाचच मिनिटांचा अवधी असतो. साडी सोडून पँट, शर्ट, कोट कसा घालायचा या विवंचनेत मी होतो. पण शिक्षकांनी सूचना केल्यावरून प्रयोगापूर्वी पँट आत घातली आणि वर नायलॉनची साडी परिधान केली. नायलॉनची साडी परिधान करणे एक दिव्यच असतं, कारण तो पदर सांभाळा सावरण्यात पुरेवाट होते. पण कसातरी तो अग्निदिव्यासारखा प्रसंग मोठ्या बहारीने निभावून पडद्याआड आलो झटकन् साडी सोडून शर्ट आणि कोट परिधान केला. 'तो मी नव्हेच' मधला प्रभाकर पण-शीकरानीसुद्धा एवढी गडबड केली नसेल हो– इतक्या चलाखोने मी स्टेजवर परत आलो. कोट बंद गळ्याचा व आधुनिक शेरवानी टाईपचा होता त्यामुळे कोटाचो बटणे वरखाली झाली होती. हे माझ्या ध्यानातसुद्धा आलं नाही. साऱ्या प्रेक्षकांची हसून हसून मुरकडी वळत होती. गंभीर प्रसंग स्टेजवर चालू असतानासुद्धा!! प्रेक्षक का हसताहेत हेच मला समजेना अंक संपल्या-नंतर मला जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा मी पुरताच खजिल झालो होतो.

'पैसे झाडाला लागतात' च्या बैठकी चालू असतानाच आमच्या एका शिक्षकांचे परगांवच्या हायस्कूलमध्ये असलेले सहकारी मित्र एका बैठकीला हजर होते. त्यांनी माझा कांचनच्या भूमिकेतला 'दिव्य अभिनय पाहून मला त्यांच्या हायस्कूलच्या गॅदरिंगच्या नाटकासाठी आमंत्रणपर सुपारी देऊन माझा गौरव केला. पण हा गौरव मला खूपच महाग पडला. कारण गॅदरिंग असतं ते अगदी ऐन परीक्षांच्या मोसमात. मला साधारणपणे आठवड्यातून एकदा त्या गावी नाटकाच्या तालमीसाठी जावं लागणार होतं. नाटक होतं "वेगळं व्हायचंय् मला!" भूमिका होती सुलभा वहिनीची– एका सोशिक कुटुंबवत्सल घरंदाज सुनेची! सुरुवाती-पासूनच रडं पाचवीला पुजलेलं!! 'पैसे झाडाला लागतात' मधली अवखळ 'कांचन' आणि 'राणीचा बाग' मधील आंधळी 'उमा' याहून 'वेगळं व्हायचंय् मला' तली 'सुलभा' खास भिन्न होती. ती भूमिका साकार करणं अवघड होतं– पण सुयोग्य दिग्दर्शन, अस्खलित पाठांतर आणि आवाजातील चढउतार व अभिनय यावरच ती भूमिका पहिल्या दोन अंकात तरली. तिसऱ्या अंकास सुरुवात होण्यापूर्वी कुठल्यातरी एका इरसाल गुंडानं हायस्कूलच्या मुलींच्या अंगावर 'खाजकोयली' टाकली आणि विद्यार्थिनीकडून तक्रार आली गुंडाचा शोध करून पकडेपर्यंत आणि त्याचा खरपूस समाचार घेईपर्यंत आमच्या तिसऱ्या अंकानं कायमची विश्रांती घेतली. आहे की नाही गंमत!!

असे नाटक पडले–भूमिका सफाचाट आपटल्या, तरी 'अचपळ चपळ मन माझे, ना आवरता आवरेना' अशी रामदासउक्तिप्रमाणे नाटकाचा छंद सुटला नाही, फंद करावासा वाटला, पण कपाळी दंड मात्र आला.

अशा कित्येक आठवणी विचारतरंगासारख्या आणि शांत सरोवरात एकाद्या बेडकानं उडी मारावी गोल, अर्धवट, अस्पष्ट तरंग–लाटा उमटाव्या– तशी मनाची कवाडं उघडतात–लगेच मिटतात पण आठवणी तशाच हवेत विहरतात– स्वच्छंदपणे!! मनाला चैन पडत नाही–वेळ जात नाही म्हणून काहीतरी करायला जावं आणि ते फंद गळचाला तातप्रमाणे आवळावं अशी स्थिती होते. नाटकं करूनसुद्धा नाट-क्याचे जीवन मला जगता येईल असे– वाटत नाही. जे झालं ते खूप झालंय, होतय ते छान होतय आणि होईल ते भल्यासाठी होईल म्हणून 'यदल्पमति बहू' म्हणून शांत रहावं– अगदी अखेरच्या क्षणापर्यंत ही इच्छा– ही कामना नटेश्वर नटराज पुरी करील हीच आशा!!– हवेत विरू नये-- धुक्यासारखी-- ✕



Scanned with CamScanner



# आघात

बी. व्ही. कुंभार
प्र. व. कला.

काल पासून मंगला अस्वस्थ, अस्वस्थच होती. काहीतरी आपलं चुकलंय, नको ते आपल्या हातून घडलंय याची जाणीव तिला सारखी टोचत होती; बेचैन करीत होती. होय, उनाडक्या करू नयेत म्हणून मंगलाताईनं संजीवला दटावलं होतं. परत बोलला म्हणून एक चापट सुद्धा लावली होती. पण केवढा प्रहार झाला होता तो संजीवच्या मनावर ! मंगलाताईचं किती किती प्रेम होतं त्याच्यावर ! केवढी अथांग माया केली होती तिनं सजीववर ! पोरकेपणाच्या भयाण रखरखोत वाळवंटात सुद्धा ओयॅसिस बनून आजवर संजीवला गारवा देत आली होती. अवघ्या बालपणीच त्याला आई वडील सोडून गेले असले तरी पोरकेपणाची झळ त्याला कधीच लागू दिली नव्हती तिनं. आणि संजीवलासुद्धा मातेच्या ममतेची कमतरता कधीच भासली नव्हती. नाहीतरी मंगलला तरी कोण होतं दुसर जीव लावायला या जगात ? छोटया संजीवचा ती प्रतिपाळ करीत होती; त्याला हवं नको ते ती पहात होती, तोंड भरून गोड कौतुक करीत होती. संजीव म्हणजे वहिणीचा जीव की प्राण ! त्याला काही दुखलं की हिला कळ येई, त्याला काही खुपलं का हिच्या डोळचात पाणी येई !

संजीवला क्रिकेटचं फार वेड होतं, आणि म्ह नच त्याच्या वाढदिवसानिमित्त मंगलाताईनं संजीव क्रिकेटचा सच दिला होता. क्रिकेटचा संच मिळा म्हणून त्याला खूप, खूप आनंद झाला होता; आ त्याचा तो आनंद पाहून मंगलाताईलाही खुप समाधान वाटलं होतं ! शाळा सुटल्यानंतर मित्रा बरोबर क्रिकेट खेळण्यात संजीवचे तासन तास नि जायचे आणि मंगलाताई त्याचा तो खेळ गच्चीवरू तासन तास न्याहळत बसायची. आणि मग, दोघासा लागणारा स्वैंयपाक ते दोघे मिळून क्षणात करावयाचे खूप खूप मजा यायची त्यावेळी. जेवताना संजी आपण दिवस भरात केलेले ' पराक्रम ' आणि शिक्षकां मिळविलेली शाबासकी सांगावयाचा. मंगला त्याचं तों भरून कौतुक करायची. अभ्यासानंतर ताईची गो ऐकता ऐकताच संजीव निद्राधीन व्हायचा. तिला केव तरी समाधान वाटायचं, आणि तीही आपल्या भावी आयुष्याची गोड स्वप्ने रंगवीत रात्रीच्या कुशीत गुज-गोष्टी करीत झोपी जायचो.

पण आज ती संजीववर रागवली होती. त्याच्या उनाडपणावर ती चिडली होती. तो उलट बोलला

म्हणून त्याच्या लालचुटुक कोमल गालावर चापट सुद्धा मारली होती. तिनं दटावलं होतं, "उद्याची मॅच तू खेळता नये. घोड्याएवढा झालास तरी शहाणपणा आला नाही. सबंध आठ दिवसात पुस्तकाला हातसुद्धा लावला नाहीस, नापास होणार की काय? चल ठेव ती बॅट आणि बैस अभ्यासाला." असे म्हणून हातातल्या बॅट–स्टंपा तिने काढून घेतल्या होत्या आणि, "नाही जा," च्या आवाजाबरोबर फाडकन् त्याच्या श्रीमुखात वाजली होती. कितीतरी वेळ तो बागेच्या एका कोप–ऱ्यात मुसमुसत बसला होता! --- कसलातरी विचार करीत --- काहीतरी मनाशी बांधीत ---

केवळ एकच चापट पण केवढा आघात झाला होता त्याच्या निरागस मनावर! 'ताई आजवर माझ्यावर कधीच रागावली नव्हती. तिनंच मला क्रिके-टचा संच दिला होता. खेळावयास परवानगी दिली पण रविवारची मॅच हरलो म्हणून चिडलेय ती माझ्यावर. पण उद्या जिंकल्यावरच मी ताईशी बोलेन. पण माझा खेळ पहावयास माझी ताई येणार नाही!' असा काहीतरी विचार करीत त्याचं कोवळं मन कुठतरी भरकटत होतं. संध्याकाळी तो जेवला नाही, बोलला सुद्धा नाही. त्याचं ते मौन मंगलला कसंतरीच वाटत होतं. असह्य होत होतं. पण पोराला वळण लागलंच पाहिजे म्हणून ती ते सहन करीत होती.

पण संजीवच्या बालीश मनानं मनस्ताप करून घेतला होता, आणि 'आपलं काहीतरी चुकलं असलं पाहिजे,' असा विचार करीत मुसमुसत केव्हाच निद्रा–धीन झाला होता. झोपलेल्या संजीवच्या गालावरून त्याचे अश्रु पुसण्यासाठी मंगलने जेव्हा हात फिरविला, तेव्हा तिला त्याचं अंग जरा गरमच लागलं होतं. मंगला अस्वस्थच झाली होती. काहीतरी आपण चुक–वलं असं व्हावयास नको होतं, हा एकच विचार तिच्या मनाला सारखा डाचत होता. टोचत होता. बेचैन बनवत होता. त्यामुळेच झोपेनेही तिच्याकडे पाठ फिरवली होती. मधूनच संजीव बरळत होता. "ताई! काही चुकल का माझं? पुन्हा नाही बरं का उनाडक्या करणार. पण तू उद्या येणार ना माझी मॅच पहावयाला? उद्या मी नक्कीच विजयी होईन!" घायाळ झालेलं मंगलचं मन पहाटेच्या गारव्याने फुंकार घातल्यामुळे झोपी गेलं होतं. आणि जागा झालेला संजीव ताईचे बरळणे ऐकत होता, "जा बरं का संजू खेळायला. मी नाही अडवणार तुला" संजीव मनातल्या मनात फुलून गेला होता. अगदी हरखून गेला होता! आजची मॅच जिंकण्याची त्याची उमेद बळावली होती.

सकाळपासून कोणीच कोणाशी बोलले नव्हते. मंग-लचं घायाळ हृदय आक्रंदत होतं. संजीवची ताई म्हणून मारलेली हाक ऐकण्यासाठी तडफडत होतं. 'नाही रे संजा चुकले मी, क्षमा कर मला!' म्हणून हात पसरून त्याला मिठीत घेण्यासाठी धाव घेत होतं. परंतु तिची कर्तव्यबुद्धी तिला रोखत होती. आपण संजीवची बहीण आहोत याची तिला जाणीव होती. मायेपोटी कर्तव्य विसरून तिला चालणार नव्हतं, त्याला स्वतःचे कर्तव्य समजणं आवश्यक होते. ताई जन्मभर त्याला साथ देऊ शकणार नव्हती. तो जेव्हा तिची माफी मागेल, तेव्हाच ती त्याला प्रेमान मिठीत घेणार होती. आणि तरीसुद्धा बॅट-स्टंपा घेऊन जाणाऱ्या संजीवला अडविण्याचा धीर तिला झाला नाही. कोणीच कोणाशी बोलत नव्हते. दोघानीही अबोला धरला होता. पण दोघांच्याही मनात हुरहूर त्याना खात होती. अस्वस्थ बनवत होती. आपली काहीतरी चूक होत आहे, गफलत होते आहे याची जाणीव त्यांना बोचत होती आणि तरीसुद्धा दोघ मुक्यासारखे, घुम्यासारखे गप्प होते! जाता जाताच 'ताई जातो' म्हणून हात वर करून संजीव निघून गेला होता. मंगला सुद्धा तशीच उठून पेपर लिहिण्यास गेली होती.

पण आज तिचे लक्ष कुठेच लागत नव्हते. काल–पासून संजीवशी बोलले नाही, झोपेत का असेना माझी क्षमा मागून सुद्धा– "ताई चुकलं माझं! क्षमा कर मला! पुन्हा नाही मी उनाडक्या करणार, पण माझी मॅच पहायला येणार ना तू!" तरीसुद्धा आपण त्याला क्षमा केली नाही. त्याची मॅच पहायला गेले नाही--- पेपर लिहिण्यास लक्षच लागेना तिचं. विचा–रानी डोकं भणाणून सोडलं अगदी; शेवटी नाही रे संज्या चुकलं माझं--! असे काहीसे शब्द पेपरावर उतरू लागले, तेव्हा पेपर लिहिण्यात काहीच अर्थ नाही हे

ओळखून मंगल अर्धवट पेपर टाकून घरी आली. तिच्या डोक्यात चाललेल्या वादळानं तिला चैन पडत नव्हती.

घरी येताच तिने कॉलेजचे कपडे बदलले. निळी-शार साडी आणि निळाच ब्लाऊज तिने परिधान केला. केस व्यवस्थित करण्यासाठी जेव्हा ती आरशासमोर उभी राहिली, तेव्हा आपला चेहरा बराच सुकला असल्याची जाणीव तिला झाली. चपला चढवून ती बाहेर पडतच होती, पण– उंबरठ्याशीच ती ठेचाळली. अंग–ठ्यातून भळभळा रक्त आलं. जीव कळवळला, मन गडबडलं ! ती पुटपुटली ' चिडलाय माझा संज्या आज माझ्यावर ' आणि ती भराभर चालू लागली. ग्राउंडच्या दिशेने पाय पडत होते.

जगाचा बाजार नित्यनियमानं चालला होता. युद्ध आणि आणीबाणीची त्याला पर्वाच नव्हती. रस्त्यावरील वहानं भर वेगानं रस्ता कापीत होती. मंगला चालत होती. आठवणी चाळविल्या जात होत्या.

अपराधी मन बेचैन होत होतं. आणि आडखळला एका आर्त किंकाळीनं मंगलचा पाय. हृदयाचा ठोका सुद्धा चुकल्याचा भास झाला. मन थरकलं, कंपित झालं. काय झालं समजण्यापूर्वीच मंगला जाऊन पोहचली सुद्धा ! जगाची पर्वा नसलेल्या बेताल ट्रकानं समोरून मॅच जिंकल्याची वार्ता धावत येणाऱ्या अेका चिमण्या जीवास धडक चिरडून टाकलं होतं !

मंगला पहात होती. संजीवचा रक्तबंबाळ देह काजवेच चमकले, डोळ्यापुढे अंधारी आली, सारं आपल्या भोवती गरगर फिरतय असाच भास तिला झाला. पायाखालची जमीन सरकू लागली दुसऱ्याच क्षणी " संऽऽजीऽऽव !" असा चित्कार मंगला त्याच्या रक्तबंबाळ देहावर कोसळली !! किती तरी वेळानंतर अर्धवट ग्लानीमध्ये संजीव तरी पुटपुटत होता, " ताई जिंकली बरं का मं-- आता - - - तरी · - - क्षमा क - · क · - करशील ना

### शीलरक्षणार्थ प्राणत्याग करणाऱ्या सति पद्मिनी

पिसाट पाकस्तानी सेनेतील अत्याचारी राक्षसांचा अबलानी मोठा धसका घेतला असल्यास नवल नाही. त्या नराधमांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी अनेक स्त्रियांनी आत्महत्या केल्याचे या भागांत आढळून आले. नुकत्याच मुक्त केल्या चौंदगा व मेहेरपूर भागांतील गुडघाभर पाणी असलेल्या तळयांत आणि रस्त्याकडेच्या पाटामध्ये गळचाला दोऱ्या बांधून आत्महत्या केलेल्या शेकडो स्त्रियांची प्रेते दिसली. सति पद्मिनीचे मृतदेह हा भाग मुक्त केल्यावर जवानांना आढळले तेव्हा शीलरक्षणार्थ त्यानी केलेले हे अग्निदिव्य पाहून सर्वांचे हृदय विदीर्ण झाले !



Scanned with CamScanner

# रंग भावनात रंग



कु. ज्योत्स्ना उर्फ उषा
श्री. आसगांवकर
प. पू. वाङ्मय

समोर पाहिलं–माझं मन लाजलं. गडकऱ्यांच्या 'गुलाबी कोड्या'ची उगाच आठवण झाली. याच संध्यारंगावर त्या कल्पनेच्या कुबेराने त्या सुंदर ओळी रचलेल्या–

–रंग इकडचा तिकडे गेला
प्रभा कुठून गेली ।
की जादूची नजरबंदी
कुणी कशी केली ?

हाच तो संध्या राग. गोविंदाग्रजांनी त्याला सलज्ज प्रेयसीच्या गालावरची लाली आणली. पण मला वाटतं सारे कवी संकेताचे दास असतात. संध्येला बघून त्यांना असंच का वाटावं ?

ऐन परीक्षेच्या वेळचे दिवस होते ते. दिवसभर अभ्यासाच्या ओझ्याखाली लादलेलं मन पुढील भवितव्याची स्वप्नं रंगवीत होतं. अभ्यासाकडे माझं मनच लागेना. मी खिडकीजवळ गेले. आजची संध्याकाळ खरोखर मोहक होती. माझे सौंदर्योत्सुक मन कल्पनेच्या अंतरंगात स्वच्छंद विहार करू लागले. सारे कवी अशा रम्य संध्याकाळावर ठराविक कल्पनाच करीत बसतात. हा पश्चिमेकडील गहिरा गुलाबी संध्यारंग– हा काय संध्यारंग आहे ? हा तांबडा लालभडक संध्यारंग म्हणजे काळ्या भिल्लीणीच्या हातातून पहाटे निसटलेले दिवसाचे ते सावज ! आता तिच्या आटोक्यात आले आहे. आणि त्या सावजाच्या उरात खोल रुतून बसलेला तिचा हा बाण, त्या उरातून वहाणारे हे रक्त पश्चिमेकडे पसरत आहे.

हे भराभर बदलणारे रंग !– केशरी, नारींगी अंजीरी, स्वर्गद्वारात आपल्या प्रियकराची वाट पहाणाऱ्या अप्सरेच्या शालूचे हे रंग आहेत. ती अप्सरा आपल्या प्रियकराला कोणती वेशभूषा आवडेल, या संभ्रमात पडली असावी. हा त्याला आवडेल असे वाटून ती एखादा शालू नेसू लागते. पण नेसता नेसताच तो तिचा नावडता होतो. ती दुसरा अधिक सुंदर दिसणारा शालू



Scanned with CamScanner

नेसू लागते. पण कुठल्याच शालूने तिचे समाधान होत नाही. ती पुन्हा पुन्हा शालू बदलत आहे.

समोर पसरलेल्या अद्भुत सौंदर्याला माझीच दृष्ट लागेल असे मला वाटले. मी डोळे मिटून विचार करु लागले.

समोरच्या घरात कोणीतरी सतार वाजवीत होते. सतारीच्या त्या मृदु, मुग्ध, मुलायम आणि मधुर स्वरांच्याद्वारे नेत्रपल्लवीच काय पण हृदयाची भाषा देखील प्रकट होईल असे मला वाटल्या वाचून राहिले नाही. मी डोळे उघडले. दिवसभराच्या उन्हाची तिरीप लागून लाल झालेल्या संध्येच्या मुखावर रक्तिमा पसरली होती. आणि त्यावर भुरभुर उडणारे केस---

दिवसरुपी प्रियकराशी प्रणयक्रीडा करून थकलेली संध्या-सुंदरी, सखी निरवतेची छाया बनून मंद-मंद पाऊले टाकीत धरतीवर उतरत होती. ती मंदपणे उतरली आणि तलावातील कमलपुष्पाच्या दलात निद्राधीन झाली.

निळसर काळपट ढग, मावळते सूर्यबिंब, रंगून गेलेले मेघ, अंधाराची विरल छाया, संध्यातारका यांचे मनोहर संमेलन मी पहात होते. नकळत माझे पाय समुद्र किनारी वळले.

समुद्रावरील शांत एकांत आणि शरदऋतुतले मधूर चांदणे, चांदणे कसले ! चंद्राच्या सुरईतून पृथ्वीवर ओतले जाणारे ते उन्मादक मद्यच- दुरून सूर गुं[illegible] होते. वाऱ्यावर वहात होते.

सांग मना तुज काय हवे ?  
हे स्वप्न म्हणू की चित्र नवे ?

खाली वाळू, सरणारी, झुरणारी, वरती आकाश; फु[illegible] णारे, फुटणारे. मध्ये माझं अस्तित्व. कशासाठी?--.

मनाला एकाएकी कसली तरी ओढ वाटू लागली. कसली ? का ? असं का ? सुंदर पाहिलं, सुरेख देखि[illegible] तर आनंद व्हावा का दुःख ! गोड गीत ऐकलं तर सु[illegible] वाटावं का दुःख. कवि कुलगुरु कालिदासाच्या अम[illegible] पद्यपक्ती आठवल्या :

रम्याणि वीक्ष मधुरांश्च निशम्य शद्व'न्  
पर्युत्सुको भवति यत् सुखिऽनोपि जन्तु।

व्यक्तिसुद्धा सुंदरेच्या दर्शनानं आणि मधुर शद्बांच्या श्रवणानं पर्युत्सुक बनते. हंसपादिकेच्या संगीत श्रवणा[illegible] राजा दुष्यंताची अशीच स्थिती नव्हती का झाली ?-- मी चालतच होते --- सारं कसं शांत शांत होतं--- आणि त्यात हा एकांत ------ मन मात्र एकाए[illegible] अशांत --- !

X

## गड आला पण जगदीशसिंह गेला !

" डिसेंबरच्या ११ तारखेला हुसेनीवाला विभागात सीमा सुरक्षा-दलाचा कॉन्स्टेबल जगदीशसिंग याने आपला जीव कुर्बान करून दहा भारतीय जवानांचे प्राण वाचविले.

शत्रूचा जबरदस्त गोळीबार चालू असतांना जगदीशसिंग चौकी-बाहेर जाऊन दारुगोळा घेऊन आला. जगदीशसिंग याच्या या असामान्य साहसामुळेच ही चौकी व दहा जवान टिकून राहिले. चौकीचा गड राहिला पण जगदिश सिंह मात्र निघून गेला.



Scanned with CamScanner

# मराठी निसर्गकवितेतील चंडोल

कु. कुलकर्णी एस्. व्ही.
प्र. व. साहित्य

'सुश्लोक वामनाचा । अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ॥
ओवी ज्ञानेशाची । निसर्गकविता बालकवींची ॥

असे म्हटले तर अतिशयोक्ति होईल असे मला मुळीच वाटत नाही. निसर्गाशी इतका तन्मयतेने समरस होणारा इतर कोणताही कवी आढळत नाही.

महाराष्ट्राला आपल्या मोहक मधु-मधुर काव्य-वाणीने मोहून टाकणारे बालकवी- त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९० साली खानदेशांत धरणगाव या गावी झाला.

भक्तिकाव्य आणि रसिकता ही बालकवींच्या ठिकाणी अनुवंशिकच होती. निसर्गावर त्यांची भक्ती होती. आणि निसर्गातील रसाला जेव्हां त्यानी शब्दात रूपांतरित केलं त्यावेळी त्या निसर्ग कवितेचेसुद्धा भक्ति काव्यात रूपांतर झालं.

शाळेपेक्षासुद्धा त्यांना आपल्या घरीच पुष्कळ शिक्षण मिळालं आणि हे शिक्षण त्याना देणारी व्यक्ती आणखी कोणी नसून त्यांचीच वडील बहीण होती. म्हणून गुरुबद्दल जितका आदर असावा तितकाच त्याना आपल्या बहिणीबद्दल आमरण होता. तिच्याशी भेंड्या खेळून संस्कृत, मराठी आणि हिंदी या तिन्ही भाषांतील सर्वोत्कृष्ट काव्यांचा त्यांनी परिचय करून घेतला होता. त्यांच्या काव्याचे वातावरण अशा प्रकारचे भाविक होते. त्यामुळे त्यांची सर्व काव्ये भावपूर्ण अशीच बनली.

त्यांच्या सर्व कवितेतील प्रतिमा निसर्गाच्याच आहेत. मनाच्या प्रसन्न वृत्तीत आणि विषण्ण वृत्तीत



Scanned with CamScanner

स्फुरलेल्या या दोन्ही प्रकारच्या निसर्गविषयक कवितांशी त्यांच्या जीवनाचा प्रत्यक्षपणे संबंध आहे. आणि म्हणूनच अंत:करणाला जाऊन भिडणाऱ्या अशाच त्या आहेत. निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करताना जे सौंदर्य आढळले त्यालाच त्यांनी आपल्या लेखणीद्वारा मूर्तरूप दिलं. सृष्टीच्या सान्निध्यात त्यांना स्वत:चे देहभान उरत नसे.

जात्याच सौंदर्यवादी असणारे बालकवि सौंदर्याने मुसमुसलेल्या सृष्टीच्या वर्णनाने भावनांवर होऊन मोहून जात. त्यामुळे सौंदर्याचा साक्षात्कार झाल्यावर भावनाधीन होऊन त्यांचं मन त्यानाच म्हणू लागे–

" सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे "

आनंदी आणि आशावादी वृत्ती असताना अरुण, संध्यारजनी, फुलराणी वगैरे काव्ये लिहिली. या त्यांच्या काव्याबद्दल एके ठिकाणी टिळक म्हणतात–

"त्या त्यांच्या कविता त्यांच्याच म्हणून अर्वाचीन विदग्ध वाङ्मयात निरंतर शोभणाऱ्या आहेत. कल्पनेचे सहजपण, रचनेचे सरळपण आणि वर्णमाधुर्य हे त्यांच्या कवितेचे गुण आहेत. आणि हे गुण म्हणजे त्यानाच ईश्वराकडून मिळालेली संपत्ती होती.

बालकविंची वर्णने म्हणजे विविधतेने नटलेली एक वेधक चित्रशाळाच आहे. तिला कमनीय कल्पनांची साथ मिळाली आहे. आणि त्यामुळेच त्याची वेधकता द्विगुणित झाली आहे.

" हिरवे हिरवे गार गालिचे "

किंवा

" नील कुणी । इंद्रमण्यांच्या कांतिहुनि ॥
गोकर्णी । मिश्र जांभळे तसे कुणी ॥ "

या त्यांच्या पंक्तिवरून त्यांच्या शब्दात असणारी रंगाची किमया दृष्टोत्पत्तीस येते.

एखाद्या रत्नपारख्याने रत्नें निवडावीत त्याप्रमाणे या रत्नपारख्याने मौल्यवान शब्दरत्नांची निवड केली आहे. यांच्या प्रत्येक शब्दात सुरेल संगीत आहे. म्हणूनच तर कान त्या श्राव्य संवेदनेचा अनुभव सतत घेत असतात. सुरेल संगीताबरोबरच अर्थाची चारुता पण यांच्या काव्यात आढळते.

बालकवींच्या कल्पनारम्यतेचे दर्शन ---

" कोण बरे त्या संध्येतून हळूच पाहते डोकावून ।"

या ओळीवरून आपल्याला सहज घडते. त्यांच्या लेखनशैलीत एकप्रकारचे लीलालाघव आहे. तिच्यातील लडिवाळपणा व खेळकरपणा मनाला मोह पाडतो. दृश्य सौंदर्याचे आणि श्राव्य माधुर्याचे समर्पक कुंचल्याने चित्र काढून ते रसिकांच्या अंत:चक्षुपुढे उभे करणारा त्यांच्यासारखा दुसरा कोणताच कवी मराठी वाङ्मयात आढळला नाही. कारण त्यांच्या भाषेतील गोडवा आवळ्याप्रमाणे आहे. आवळा जो जो चाखावा तो तो त्यात अधिकच गोडव्याची भर पडते. त्याप्रमाणे यांच्या काव्यातील रसाचा आस्वाद जो जो घ्यावा तो तो त्यात अधिकच रसाळपणा येत जातो.

आपल्या बालसुलभ, निष्पाप, कोमल अशा व्यक्तित्वाच्या ठेवणीस अनुसरूनच बालकवी निसर्गाकडे आकर्षिले गेले. निसर्गाशी ते समरसले. आणि त्यातूनच त्यांची निसर्गकविता जन्मली.

ज्याप्रमाणे रे. टिळक ' फुलांमुलांचे कवि ' म्हणून ओळखले गेले; किंवा गोविंदाग्रज 'प्रेमाचे शाहीर' म्हणून प्रसिद्ध झाले; अथवा ' राष्ट्रीय कवितेचा उद्‌गाता ' म्हणून विनायक ख्यातनाम झाले त्याचप्रमाणे " मराठी निसर्गकवितेतील चंडोल " म्हणून बालकवी गाजले.

पण हा चंडोल अल्पकालातच रसिकांना आपली काव्यसंपत्ती शिल्लक ठेवून ५ मे १९१८ ला उडून गेला तो कायमचा. अवघ्या २८ व्या वर्षी त्याने आपल्या जीवनाची इतिश्री केली.

# प्रेमाचे उदाहरण

अे. अेस. शिंदे
प्र. व. वाणिज्य

प्रेम ! प्रेम ! प्रेम ! प्रेम हा शब्द ज्याला माहित नाही त्याला ह्या लेखाचा अर्थ बिलकुल कळणार नाही. प्रेम शब्द उच्चारल्याबरोबर सध्याच्या कॉलेज कुमारांच्या मनांमध्यें एकप्रकारची प्रेरणा प्रेरीत होते. बऱ्याच कॉलेजमध्यें बरीच मुलं एखाद्या व्यक्तीवर प्रेम करतात. ह्या प्रेमामध्यें एखाद्या मुलाचे एखाद्या व्यक्तीवर प्रेम असते. पण त्या व्यक्तीचे स्वतःवर प्रेम आहे की नाही हे माहित नसते. अशा प्रेमाला काहीच अर्थ नसतो. प्रेमाबद्दल अनेक लोकांची वाईट व चांगली मते आहेत. प्रेम हे अनेक लोक अनेक व्यक्तींच्यावर करतात.

कोण्या एका लेखकाने म्हटले आहे की, " प्रेम ही अशी वस्तु आहे की, तिला कड्या कुलूपे अडवू शकत नाहीत." पण माझ्या मते कांही ठिकाणी प्रेम ह्या वस्तुला कड्या कुलूपे अडवू शकतात. उदा. एखाद्या मुलाचे एखाद्या मुलीवर फार फार प्रेम असते. पण तिचे आई व वडील तिला एक दिवसही घरातून बाहेर जाऊ देत नाहीत. व कांही दिवसानी त्या मुलीचा एखाद्या तिसऱ्याच व्यक्तीशी विवाह लावून देतात. या ठिकाणी प्रेमाला अडविणारी त्या मुलीची आई म्हणजे कडी. व वडील म्हणजे कुलूप अशी मी माझी कल्पना व्यक्त करतो. इथे त्या मुलीला कड्या कुलुपे अडवू शकतात. पण मला ह्या प्रेमवीरांना असं सांगायच आहे की, प्रेम ही मनाची सर्वात प्रभावी प्रेरणा आहे. प्रीती ही एक हृदयातून उगम पावणारी आणि दुसऱ्या हृदयाला जाऊन मिळणारी महानदी आहे. कॉलेज कुमारांना मला सांगायचं आहे की, कॉलेजातले प्रेम हे एक स्वप्न असते. प्रेमाने प्रेमाला प्रेमपत्र पाठवावं. तरुण स्त्रियांचा सहवास म्हणजे ताऱ्या फुलांच्या सुगंधासारखा आहे ती फुलं खुडावी, हातांत घ्यावी, अशा इंच्छेचा उद्भव झालेला नसताही केवळ त्यांच्या सुगंधानं मन दरवळून जातं. तरुण स्त्रियांच्या सहवासाचं असंच आहे. —— प्रेमाच्या शिव्या खाल्याशिवाय प्रेमपत्र मिळत नाही



Scanned with CamScanner

आणि देताही येत नाही. एका थोर व्यक्तीने म्हटले आहे की, प्रेमावर आपली सत्ता चालत नाही, ती एक अशी आग आहे, जी पेटवल्याने पेटत नाही आणि विझवू म्हटल्यास विझवताही येत नाही. " खरं आहे. माझा यावर विश्वास आहे. पण तुमचाही आहे की नाही ते मात्र माहीत नाही. आणि एका लेखकाने म्हटले आहे की, स्त्री ही माणसाची सावली नसून जीवनाच्या सहवासातील यात्रेकरु आहे. पण ह्या यात्रेकरुमध्ये व माणसामध्यें प्रेम हे असावेच लागते. या कॉलेज-कुमारीच्यामध्यें भावना व विचार, आत्मविश्वास आणि आणि उत्साह यांचे सुंदर मिश्रण आढळते. पण खऱ्या प्रेमाची प्रेरणा एकाही कुमारामध्यें आढळत नाही. कॉलेजमधील मुले मुलींच्यावर कागदाचे बाण मारतात. पण त्याना हे कळत नाही की, " बाण जिथून सुटतो तेथे त्याची कांहीच साक्ष रहात नाही. पण जिथे जाऊन भिडतो तेथे जखम होते. " परवाच मित्रांच्या सहवासात घडलेली गोष्ट. माझ्या एका मित्राला एकाएकी ठसका लागला. तेव्हा मी त्याला विचारले, असे तुला हा एकाएकी ठसका कसा लागला ? या प्रश्नाचे उत्तर त्यानं असं दिलं की, त्या कडेला जी उभी आहे ना (अर्थात शेजारीच मुलींचा घोळका उभा होता.) तिनं आपल्या डोळयानी माझ्यावर बाण मारला. आणि तो बाण माझ्या हृदयात आरपार घुसला. आणि माझ्या हृदयाला जखम झाली. त्यामुळे मला ठसका लागला. अशा मुलांना मला हे सांगायच आहे की, कल्पना करून प्रेम करण्यापेक्षा प्रेम करुन कल्पना करावी. फक्त कल्पना आणि भावना असून उपयोगी नाही. प्रेमामध्ये स्वार्थ असून उपयोगी नाही. स्वार्थरहित प्रेम हेच मैत्रीचे सार होय.

प्रत्येकाने प्रेमासाठी त्याग केला पाहिजे. " त्यागाच्यावेलीला माणूसकीचे संरक्षण द्यावे लागते व अश्रूंचे सिंचन करावे लागते. तेव्हां त्या वेलीला प्रेमाची फुलं येतात. प्रेम हे पुरुषाच्या जीवनाचा एक भाग आहे, पण स्त्रीचे जीवन सर्वस्व आहे. प्रेम हे अनेक व्यक्ती अनेक व्यक्तींच्यावर करतात. आई लहान बाळावर प्रेम करते. गुरुवर्य मुलांच्यावर प्रेम करतात. कांही लोक कुत्र्यावर प्रेम करतात, कांही लोक घोड्यावर प्रेम करतात, व कांही लोक गाढवावरही प्रेम करतात पण स्त्री आणि पुरुष किंवा प्रियकर आणि प्रेयसी यांच्या प्रेमातील गोडी फार निराळीच असते. प्रेम हे झाडाच्या सावलीसारखे आहे. प्रेम हे कधीच पाप होऊ शकत नाही. प्रीती ही अतिशय नाजूक अशी सतार आहे. प्रीतीने अंगावर उभ्या राहाणाऱ्या काट्यांचे कवींनी कितीही वर्णन केले असले तरी भितीने अंगावर उभा राहाणारा काटा हेच माणूसकीचे खरे चिन्ह आहे.

प्रेमाविषयी इतका उल्लेख करण्याचा माझा उद्देश हा आहे की, प्रेमाची खरी गोडी ज्याला खरोखरच चाखायची आहे व प्रेम अशा कॉलेजकुमारानी करावं की, **" भाषा व शील यांची बेरीज करा, मैत्रीतून कपट व मत्सर वजा करा, सुस्वभावाला प्रेमाने गुणा, देहकष्टाला मनोरंजनाने भागा, परनिंदेचा लघूतम काढा आणि सद्‌गुणांचा वर्ग करा. " ह्या गणिताचं उत्तर ज्याचं अगदी बरोबर येईल अशानीच प्रेम! प्रेम! प्रेम! करावं.**

★★





Scanned with CamScanner

# उद्धार!

लेखक
**मुबारक मकानदार**
एस. वाय. बी. कॉम.

मालतीने डोळे उघडले. आणि भिरभिरत्या नजरेनें इतस्ततः न्याहळले. त्याबरोबर तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य अन् भिती उभी राहिली. आपण या ठिकाणी कसे आलो, आपणास येथे कुणी आणले, ही खोली कुणाची हे सारे प्रश्न एका पाठोपाठ एक तिच्या मनात आले, अन् त्याचवेळी तिची नजर कॉटवर तिच्याच शेजारी बसलेल्या तरुणाकडे खिळली. "आ --- प ---- ण कोण ? मी कुठे आहे, मला इथे कुणी आणले ? न कळत मालतीच्या मुखातून शब्द बाहेर पडू लागले.

मालतीची ही चमत्कारीक अवस्था समजून तिला अधिक त्रास होऊ नये म्हणून तो तरुण थोडा पुढे झाला. मालतीच्या मस्तकावरुन हळूवारपणे आपला हात फिरवीत तिला तो समजावू लागला, शांत व्हा, शांत व्हा ? सांगतो सगळ. त्रास करुन घेऊ नका. मुळीच भिऊ नका. विश्वास ठेवा माझ्यावर! प --- प --- ण। आपण कोण? आणि माझ्या जवळ का थांबला आहात? सांगा --- सांगा लवकर!" भावना वेगाने मालती बोलून गेली. "बाई, आपण कालच त्या देशमुखाच्या विहिरीत आत्महत्या करण्यासाठी उडी घेतली. त्याचवेळी मी त्या विहीरीजवळून जात होतो. क्षणात मी तुमच्या पाठोपाठ विहिरीत उडी घेतली आणि तुम्हाला अलगद उचलून बेशुध्दावस्थेत इथे हॉस्पिटलमध्ये आणली आहे. आता कुठे तुमची प्रकृती सुधारत आहे! त्रास करुन घेऊ नका! मी तुमच्या जवळ आहे!"

"म्ह -- ण -- जे तुम्ही मला वाचविलत! पुनः मला या नरकाच्या खाईत ओढून आणलत! का? का? मला वाचविलत? मला जाऊ द्या, सोडा! मला या जीवनाचा कायमचा निरोप घेऊ द्या. नका, नका मला इथे अशी थांबवू नका" असे म्हणतच मालती कॉटवरुन बाजूस होण्यासाठी धडपडू लागली. पण त्या तरुणाने मोठ्या मुष्कीलीने तिला अलगद धरुन ठेवले. "बाई, अशा उतावळ्या होऊ नका. तुम्हास कसलाही त्रास होणार नाही याची मी काळजी घेईन" असे म्हणतच त्या तरुणाने आपले तेजस्वी नेत्र मालतीच्या नेत्राकडे रोखले!

मालतीही आपले भान हरपून त्या तरुणाकडे पाहू लागली. त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण आकर्षण होते. एका विलक्षण मोहिनीने ती स्तब्ध राहिली. पण



Scanned with CamScanner

पुन: क्षणात ती त्या तरुणाकडे वळून उसळून ओरडली!

"विश्वास ! या विश्वासाने माझ्या जीवनाचा घात केला आहे.या 'विश्वासानेच' या जीवनात श्वासही घेण्यास मला थारा राहिला नाही! पुन: विश्वास ठेवू? शक्य नाही, शक्य नाही, कदापि शक्य नाही ! या जगात कोणावरही भरवसा ठेवून उपयोग नाही ! आता एकच मार्ग आहे. या जीवनांतून स्वत:चे तोंड कायमचे काळे करण्याचा ! आणि त्या मार्गाने मी जात असता पुन: तुम्ही माझ्या आड आलात!" कोप अनावर होऊन आणि धुंद नजरेने त्या तरुणावर आपलीनजर खिळवीत मालती जवळजवळ ओरडलीच.

तो तरुण काही वेळ स्तब्ध राहिला. मालतीला या अवस्थेतून कसे बाहेर काढता येईल, याचा तो स्वत:शीच विचार करु लागला. मालतीचे दु:ख समजावून घेण्याचे व त्यातून काही तरी मार्ग काढण्याच्या हेतूने त्या तरुणाने मालतीस विचारले, "हे पहा बाई तुम्ही असा कोणता अपराध केला आहे की, स्वत:ला इतक्या तुच्छ समजून घेता आहात ? मला तुमचे दु:ख तरी कळू द्या. आपले दु:ख आपण कोणताही संकोच न धरता सांगा. आपले दु:ख मला समजल्याशिवाय मी तरी काय करु शकतो? " मालती कसल्यातरी विचारात गढून गेलेली होती. तिची नजर परत त्या तरुणावर खिळली. त्या तरुणाकडे रागाने व तिरस्काराने पाहात मालती ओरडली, "माझे दु:ख? आणि आपणाला सांगितल्याने काय थोडेच कमी होणार आहे? आणि माझे दु:ख ऐकून आपण कोणता मार्ग काढणार आहे? माझा मार्ग मला खुला आहे. त्या मार्गात आपण का म्हणून आड येता आहात? दूर व्हा, माझ्या मार्गातून तुम्ही बाजूस जा." हे शब्द ऐकून त्या तरुणास काय बोलावे आणि काय करावे हे काही सुचेना. पण त्या तरुणाने देखील मालतीचे दु:ख समजावून घेण्याची शर्तच केली होती. तो वारंवार मालतीस तिचे दु:ख सांगण्यासाठी विनवू लागला. शेवटी मालतीची त्या तरुणापुढे हद्दच संपली. त्या तरुणास मालती आपले दु:ख सांगण्यास सुरूवात केली.

"माझे नांव मालती. मी एका गरीब घराण्यात जन्मले. माझे वडील छोटीशी नोकरी करीत होते. त्यांना महिना शंभर रुपये पगार मिळत होता. मी एकुलती एक लाडकी लेक. प्रथमपासून हुषार म्हणून शाळेत माझे नाव होऊ लागले. हे पाहून वडीलानी मला भरपूर शिकवायचे ठरविले. एस. एस. सी. मी चांगल्या मार्कानी पास झाले. नंतर कॉलेजमध्ये मला पाठवण्यात आले. तिथेही माझा नाव लौकीक होऊ लागला. मी दिसण्यास सुंदर तशी अभ्यासातही हुशार! त्यामुळे कॉलेज विश्वा दबदबा निर्माण झाला. चांगले चांगले तरुण माझ्या पाठीशी लागले. पण मी त्यांना केव्हाच जवळ केले नाही. त्यामुळे त्यांची चांगलीच त्रेधातिरपिट उडत असे. कॉलेजच्या वादविवाद स्पर्धेत तसेच लेखन स्पर्धेत मी भाग घेत असे. आणि हमखास माझा त्यात प्रथम क्रमांक येई. माझ्याप्रमाणेच एक तरुण चमकत होता. तो उमदा, रुबाबदार अन् तेजस्वी, शिवाय हुशार होता. त्यामुळे बऱ्याच मुली त्याच्यावर फिदा होत्या. पण तो कोणालाही जवळ करीत नसे. फक्त एकाच तरुणीवर तो प्रेम करण्यासाठी धडपडत होता. ती तरुणी म्हणजेच तुमच्या समोर बसलेली ही मालती. न कळत आम्हा दोघांचे प्रेम जडले, वाढत गेले, कॉलेज मधील प्रत्येक व्यक्तीला आमची जोडी परिचित झाली होती. जो तो आमच्याकडे भावी पति–पत्नी या नात्याने पहात होता. असेच प्रेम वाढत गेले. अन् ज्या गोष्टी होऊ नयेत त्या गोष्टी घडल्या. त्या तरुणाच्या बेहोशीने आम्हा दोघानाही वेगळ्या वाटेने जाणे भाग पाडले! आम्ही दोघेही बी. कॉम. ची परीक्षा एकाच वेळी उत्तीर्ण झालो. कॉलेज संपले अन् तो स्टेट बँकेत क्लार्क म्हणून नोकरीस लागला. उभयतांचे मार्ग भिन्न झाले तरी आमच्या प्रेमात यत्किंचितही अडथळा आला नाही. तो माझ्या घरी येई, मी वरचेवर त्याच्या खोलीवर जात असे. दोघेही फिरावयास तसेच सिनेमाला जात होतो. असेच मजेत दिवस जात होते. कायदेशीर रीत्या विवाहबध्द व्हायचे तेवढे बाकी राहिले होते. या अवधीत आम्ही दोघांनी कधी विवाहाचा प्रश्न काढला नव्हता. पण जणू आम्ही दोघे विवाहबद्ध होणार अशी माझी खात्री होती. त्यामुळे हा विषय काढणे म्हणजे एकमेकावर अविश्वास दाखविण्यासारखे आहे. असे आम्हास -- निदान मला तरी वाटत होते --- तो तरुण केंव्हाही अंतर देणार नाही अशी माझी



Scanned with CamScanner

काम समजूत होती. त्याच्या बोलण्या वागण्यानेमाझ्या मनात त्याच्या विषयी कधीही शंका आली नाही .असेच दिवस जात होते. एके दिवशी माझ्या शरीरात कांही वेगळ्या भावना जाणवू लागल्या. आणि त्याच वेळी माझ्या मनात एक भिती डोकावू लागली. मला दिवस गेले होते. मी आई ... होणार होते. तरी देखील त्या तरुणाबद्दल खात्री वाटत असल्याने मी धीर सोडला नाही. त्या दिवशी मी त्याच्या खोलीवर गेले. व त्यास म्हणाले ... अरे! मला दिवस गेलेत. मी की नाही आई ... होणार आहे. हे शब्द ऐकताच त्याच्या चेहऱ्यावर यत्किंचितही पालट झालेला दिसला नाही. मिस्कीलतेने तो म्हणाला, " आई होणार! मग हो ना! त्यात काय बिघडले?" अरे जग काय म्हणेल, लग्ना–पूर्वी आई होणे म्हणजे समाजाच्या दृष्टीकोनातून ते लज्जास्पद आहे. लग्नापूर्वीच्या मातृत्वास समाजात स्थान तर नाहीच उलट ते मातृत्व समाजाला निंदेस कारण होते. यासाठी म्हणते आपण लवकर लग्न करु. नव्हे, लग्न केलेच पाहिजे."

माझ्या या शब्दाबरोबर तो ताडकन माझ्या पासून दूर होत कडाडला, " आपण विवाह करु या? काय, बोलते आहेस काय हे? मी कधी तसे तुला वचन दिलेय? चार दिवस मजा करण्यापलीकडे आपल्या प्रेमात काहीच अर्थ नाही. विवाहाचा आणि प्रेमाचा संबंधच काय?"

हा त्याचा विलक्षण अवतार पाहून धरणीमाता दुभंगून मला पोटात घेईल तर बरे, असे मला वाटू लागले. त्याच्या त्या नकली,प्रेमाला बळी पडल्यामुळेच आज माझी ही अवस्था झाली आहे. त्या तरुणाने माझी फसगत तर केलीच पण मला जीवनातून उडवून दिले. माझे सर्वस्व लुटण्यासाठीच त्याने नाटकी प्रेम केले. त्या नाटकी प्रेमाला बळी पडल्यामुळे आज माझी अशी केविलवाणी अवस्था झाली आहे. आता तुम्हीच सांगा की मी कोणत्या तोंडाने या समाजात जगू शकते. अशा अवस्थेत जगण्यापेक्षा मला मृत्यूच प्रिय वाटतो. पण! माझ्या मृत्यूच्या मार्गात आपण अडथळा आणला आहात. मला सोडा, मला जाऊ द्या. " मालतीची ही करुण कर्म कहाणी ऐकून त्या तरुणाच्या मनामध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली. तो तरुण मालतीस आपुलकीने म्हणाला," मालती, मी तुझ्या मृत्यूच्या आड आलो याबद्दल मला क्षमा कर. तुझा मृत्यू आता लांब पळाला आहे. तुझा मी स्वीकार करीत आहे. तुझ्याशी मी लग्न करण्यास तयार आहे. मालती, मीही असाच लग्न न करण्याचा निश्चय केला होता. पण तुझ्या–साठीच तो निश्चय मी पायदळी तुडवीत आहे. मालती, तुला कसे सांगू की माझे लग्न गतवर्षीच झाले. एका सुंदर सुस्वरुप तरुणीशी चार, पाच महिने आम्ही एकत्र राहिलो. दोघांच्या सहवासात वेळ कसा गेला ते समज–लेही नाही. अशी चांगली माणसं दैवास पहावत नस–तील. मालती, ती एकाकी निघून गेली. कायमची निघून गेली. आणि मी एकाकी राहिलो. – एकाकी याच परिस्थितीत मी परत लग्न न करण्याचा निश्चय केला होता. पण, आज तू जगावीस यासाठीच मी माझा निश्चय रहित करीत आहे. माझ्यावर विश्वास ठेव!" मालतीचा चेहरा लाल झाला. त्याला काय बोलावे हेच समजेना. " तुम्ही माझ्याशी लग्न करणार आणि मला या अवस्थेत आपण स्वीकार करणार! "मालती, मी तुझे सर्व गुन्हे क्षम्य केले आहेत. तू त्याबद्दल कांहीही काळजी करु नकोस. मी या अवस्थेत तुझा स्वीकार करीत आहे. " आपण खरोखर धन्य आहात. मला आज आपण पुना–र्जन्म दिला आहात. माझे सर्वस्व लुटणारा व मला जीवनातून उठवू पाहाणारा एक तरुणच आहे. आणि पुनर्जन्म देऊन मला पुण्य प्रदान करण्यातही एक तरु–णच आहे."



Scanned with CamScanner

## लढवय्या सारंगा –

'बुडत्या जहाजाचा कप्तान हा त्या जहाजावर शेवट पर्यंत असतो' अशी भारतीय नौदलाची परंपरा आहे. ९ डिसेंबरला रात्री अरबी समुद्रात पाक पाणबुडीकडून झालेल्या हल्ल्यात बुडालेल्या आय. एन. एस. कुकरीचे कप्तान कमांडर महेंद्रनाथ मुल्ला आणि सेकंड इन कमांड लेफ्टनंट कमांडर जोगिंदर कृष्णन सुरी यांनी प्राणार्पण करून ही उदात्त परंपरा राखली.

९ डिसेंबरच्या काळरात्री 'कुकरी' शत्रूच्या पाणबुड्यांचा शोध घेण्याच्या कामगिरीवर निघाली होती. तेवढ्यांत पाणसुरुंगाने तिचा घास घेतला. शत्रूच्या पाणबुडीने सोडलेले तीन सुरुंग तिला लागले व ती बुडू लागली. कुकरीच्या या वीर कप्तानाने जहाज बुडणार हे लक्षात येताच इतरांचे प्राण वाचविण्याची पराकाष्टा केली. कॅप्टन महेंद्रनाथ मुल्ला यांनी सर्व अधिकारी व नौसैनिकांना लाईफ जॅकेटस घालून बोटीतून बाहेर पडण्याची आज्ञा केली. परंतु कांही नौसैनिक मागे राहिले होते. त्यांना या आपल्या धिप्पाड अधिकाऱ्याची काळजी वाटत होती. परंतु या अधिकाऱ्याने त्यांचे जीव वाचवण्याकरता त्यांना पाण्यात लोटले. एका कोवळ्या नौसैनिकाने त्यांना आपले लाईफजॅकेट देऊ केले व जीव वाचवण्याची विनंती केली. कॅप्टनने त्यांना हसतमुखाने विरोध केला.

पोहत जाणाऱ्या या नौदल सैनिकांनी आपल्या बुडत्या बोटीकडे वळून पाहिले तेंव्हा बोट जवळजवळ बुडत आली होती. बोटीचे सर्वात शेवटचे टोक म्हणजे कॅप्टनचा मनोरा, या मनोऱ्यावरील खुर्चीत कॅप्टन मुल्ला हे एकटे बसलेले त्यांना दिसले आणि अखेर कुकरीबरोबरच कुकरीच्या कप्तानाने समुद्रतळ गाठला.

ही कठोर कर्तव्यनिष्ठेची सागरी परंपरा पाळणाऱ्या भारतीय नौदलाच्या या लढवय्या सारंगाला 'महावीर-चक्र' (मरणोत्तर) देण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

# तिढा

## —अनामिका

दीप्ती - - - - - किंचीत निळसर रंगाची झांक असलेले पाणीदार डोळे, धनुष्याकृति भुवया, चाफेक–ळीचे सौंदर्य फिके पडावे इतके तरतरीत व सुंदर नाक, कमळाच्या पाकळ्याप्रमाणे रेखीव डाळिंबी ओठ, गाला-वर रक्तिमा, काळेभोर विपुल लांबसडक रेशमी केस, सडपातळ पण रेखीव बांधा, काहीसा गोल चेहरा. अशा ह्या दीप्तीत सौंदर्याची कोणतीच उणीव नव्हती. पण तिच्या संथ तेवत असणाऱ्या निरांजनाप्रमाणे दिस-णाऱ्या डोळ्यात अनेक दुःखे होती, अनेक कथा होत्या.

अठरा वर्षाची दीप्ती एस् एस् सी. ला होती. तिचे वडील, रामभाऊ साधे शाळा मास्तर. ना भाऊ ना बहिण अशा ह्या आईविना पोरीला त्यानी सारी माया दिली होती. त्यांनी तिला अंतःकरणाच्या वेलीवर फुल–लेल्या जुईच्या कोमल कळीसारखी वाढविली होती. रामभाऊनी ह्या पोटच्या गोळ्याला प्राणापलीकडे जपले होते त्याना दीप्तीला फार शिकवायचं होतं. दीप्ती–लाही शिकायची फार हौस होती. ती हुशारही होती. परीक्षा संपली. तिला सर्व पेपर सोपे गेले. फक्त रिझल्टच लागायचा होता.

६ जून - - - - आज दीप्तीचा रिझर्ट.

" दीप्ती रामभाऊ दामले सेंटरला पहिली." रामभाऊनी वर्तमान पत्रात पाहिलं आणि त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. ते पळतच घरी येत होते. मात्र येताना ते पेढे घेण्यास विसरले नाहीत. दीप्तीला कुठे ठेवू व कुठे नको असं त्यांना झालं होतं. त्या तंद्रीतच ते रस्त्यावरून चालले होते.

इतक्यात - - - इतक्यात - - - एक फियाट भर–वेगात त्याच्या मागून आली आणि त्यांना धडक देऊन त्याच वेगात निघून गेली. त्या धक्क्याने रामभाऊ दूर–वर फेकले. पुढे काय झाले त्यांना समजले नाही. ते शुद्धीवर आले तेव्हा त्यांना कळले की ते हॉस्पिटलमध्ये आहत. अति वेदनेमुळे पुन्हा त्यांची शुद्ध हर–पली. जेव्हा ते परत शुद्धीवर आले तेव्हा दीप्तीचा रडवेला सूर त्यांच्या कानी पडला. बाबा - - - किती माया एकवटली होती त्या शद्बांत. रामभाऊनी मोठ्या प्रयासाने तिला हाक मारण्याचा प्रयत्न केला. पण - - - पण - - - त्यांच्या तोंडून शद्ब बाहेर पडले नाहीत. अपघातात त्यांची वाचा गेली होती. त्यांच्या डोळ्यात पाणी आले. आपल्या लाडक्या लेकीकडे पहात असता–नाच त्यांचा प्राणपक्षी त्या देहाला सोडून निघून गेला. दीप्तीचे बाबा दीप्तीला पोरकी करून निघून गेले. दीप्तीने हंबरडा फोडला. पण तिचा तो आक्रोश व्यर्थ हाता. परत तिचे बाबा तिला भेटू शकणार नव्हते आपल्या वडिलांची इच्छा पूर्ण केली पाहिजे या जाणी–वेने तिला आपले दुःख आवरावे लागले.

वडिलांच्या निधनाने दुःखी झालेल्या दीप्तीला तिच्या मामाना मुंबईस आपल्याकडे येण्यास कळविलं कोणाचाच आधार नसलेल्या तिला मामांच्या घरी जाणं भाग पडलं. मामांनी तिला कचेरीमध्ये नोकरी लावून दिली. तिचे मामा जरी प्रेमळ असले तरीही मामी मात्र महाखाष्ट बाई होती. तिच्यामुळेच दीप्तीची पुढे शिकण्याची इच्छा अपुरी राहिली. ती तिला अनेक प्रकारे त्रास देवू लागली. दीप्ती तिला आयतीच मोल–



Scanned with CamScanner

मारीण मिळाली त्यामुळे दीप्तीला घरातील सर्व काम करून ऑफिसला जावे लागत होतं.

गुरुवारचा दिवस होता तो. दीप्ती दत्ताला निघाली होती. तिचा आधार आता तोच होता नाही का ? इतक्यात --- तो 'भयंकर माणूस' तिला दिसला. हो --- दीपकला ती 'भयंकर माणूस' म्हणत होती. ते नाव तिने त्याच्या आवाजावरून व देहावरून दिलं होतं. तो तिच्याच ऑफिसात सप्लाय ऑफिसर होता.

निळसर घारे डोळे, धारदार नाक, काहीसा उभट चेहरा, किंचित कुरळे केस, भरपूर उंची व आकर्षक व्यक्तिमत्त्व ही त्याची वैशिष्ठ्ये होती. त्याला ती 'भयंकर माणूस' म्हणत असली तरीही त्याला प्रथम पहाताच ती त्याच्याकडे आकर्षिली गेली होती. पण त्याच्या त्या काहीशा कडक पण घोगऱ्या आवाजाला ती घाबरत होती; बिचकत होती.

"कुठं चाललात ?"

या प्रश्नावर ती भानावर आली. ती ज्याचा विचार करीत होती तीच व्यक्ती तिला प्रश्न विचारीत होती. ती प्रथम थोडी घाबरली. पण लगेच तिने स्वतःला सावरले.

"दत्त मंदिरात."

दीप्तीने उत्तर दिलं.

"मी पण दत्तमंदिरातच जातो आहे. बरं झालं, सोबत मिळाली" असे म्हणून तो तिच्याबरोबर चालू लागला. दीप्ती मनात म्हणाली हा "भयंकर माणूस" दत्ताचा भक्त आहे तर. ती काहीशा संकोचानेच त्याच्या बरोबर चालत होती. तिचे डोळे घाबरलेल्या हरिणीप्रमाणे दिसत होते. यांच्या समवेत आपल्याला कोणीतरी पाहिले तर, या जाणीवेने ती शहारली.

दत्तमंदिरात ती देवाला हात जोडून उभी होती. तिचे नेत्र पूर्णपणे मिटलेले होते. तिच्या त्या लांबसडक बोटाकडे दीपक पहात होता. ज्यावेळी तिने डोळे उघडले तेव्हा तिला कळले की, तो तिच्याकडेच पहात आहे. ती लाजली.

काहीशा भारवलेल्या अंतःकरणानेच ती मंदिराबाहेर पडली.

"आमच्या घरी येणार ? इथून जवळच आहे आमचं घर."

या प्रश्नाने ती भानावर आली. पण तो तिच्या होकार नकाराची वाट न पहाताच चालू लागला. आता तिला त्याच्या घरी जाणं भागच होतं.

"आनद निवास" दीपकच्या घरकुलाचं नाव "आनंद निवास" होतं. हो --- घरकुलच होतं ते. दीप्तीने नाजुक पाऊलानी त्याच्या घरात प्रवेश केला. दीपकचे वडील सोप्यातच बसले होते. त्याच्या घरात प्रवेश करताच दीप्ती भारावल्यासारखी झाली होती. तिने पुढे होऊन दीपकच्या वडिलांना नमस्कार केला. "सुखी रहा पोरी" दीपकच्या वडिलांनी तिला आशीर्वाद दिला. दीपकने तिची त्यांच्याशी ओळख करून व तिला त्याने घरात जाण्यास सांगितलं. आणि तोही आईला व मनिलाला (दीपकची बहिण) हाका मारीत तिच्या मागोमाग आत गेला. दीप्तीला पहाताच तिची बहीण चटकन म्हणाली,

"हीच का तुझी दीप्ती दाभले ? आणि बर का दीप्ती हा दीपक तुझं सारखं गान गात असतो." बाकी वर्णन मात्र तंतोतंत केलं आहे हं दीपक भैय्याने.

दीप्तीला पुढचे शब्दच कळले नाहीत "तुझी दीप्ती" हे शब्द कानी पडताच ती लाजली होती आणि आनंदलीही होती. दीपकच्या घरी चहा फराळ झाल्यावर ती घरी आली होती त्या गोड धुंदीतच.

"किती उशीर केलास ? घरात तर का आलीस ? उगीच पीडा सांभाळायला घेतली. लाज नाही वाटत इतका वेळ बाहेर रहायला ? घरातली काम कोणी करायची ? कुठे गेली होतीस इतका वेळ?'

मामीच्या ह्या कडक शद्वांच्या सरबत्तीने तिची तंद्री खाड्कन उतरली. तिने पदर खोचला व कामाला लागली.

दिवसे दिवस दीपक दीप्तीची ओळख वाढतच होती. आणि एके दिवशी ती ऑफिसात जात असताना दीपकने तिला वाटेत गाठले होते व "तू मनिलाची वहिनी होशील का?" हा प्रश्न विचारला होता. त्यावेळी तिच्या हृदयात गोड उर्मी उठल्या होत्या. तिला कोण आनंद झाला होता त्यावेळी. एकतर मामीच्या जाचातून सुटणार म्हणून व दीपकची धर्म-पत्नी बनण्याचं भाग्य लाभणार म्हणून.

ती ऑफिसातून घरी आली नाही तोच तिच्या पाठोपाठ दीपकचे वडील काहीसे पळत पळतच आले. त्यांचा तो घाबरलेला चेहरा पाहून ती शहारली. आणि त्यांनी जे सांगितले ते ऐकून तर तो बेशुद्ध पडण्याच्या अवस्थेत होती. तिने भिंतीचा आधार घेतला.

दीपकला अपघात झाला होता. त्यावेळी तिला वडिलांची आठवण झाली. त्या आठवणीने तिच्या अंगावर काटा उभा राहिला. त्या अवस्थेतच ती त्याच्या वडिलांबरोबर जाण्यास निघाली. वाटेत तिला कळलं की, तो सारखा तिचंच नाव घेतो आहे. म्हणूनच त्याचे वडील तिला बोलवायला आले होते. ती पळतच हॉस्पि-टलमध्ये शिरली. कॉटवर तो झोपला होता. त्याच्या डोक्याला मार बसला होता. त्याच्या वडिलांनी "दीप्ती आली आहे" असे सांगताच त्याने डोळे उघडले. त्या अवस्थेतच त्याच्या ओठावर स्मित हास्य पसरले. दीप्ती --- बस् --- एवढंच म्हणाला तो. पण त्या दोनच शद्वांत सारं सारं प्रेम एकवटलं होतं. दीप्तीच्या डोळयातून आनंदाश्रु ओघळत होते. तो शुद्धीवर आला या जाणिवेनेच तिचे मन आनंदले होते. आणि त्याच्या तोंडची ती हाक --- दीप्ती ---

आता तिनं निर्धार केला. तिला निर्धाराचीच वाट दिसत होती. निर्धाराची पावलं त्या वाटेवरून पडणार होती --- केवळ दीपकसाठी ---!





# सुभाषचंद्र : एक चिंतन

**ए. टी. पाटील**
तृ. व. वाणिज्य

भारतीय स्वातंत्र्याच्या वेदीवर अनेक नररत्नानी आपल्या प्राणांची आहुती दिली. क्रांतीकारकांची एक दिव्य परंपराच या देशामध्ये निर्माण झाली. या परंपरेत वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगत-सिंह, नाना पाटील यांना जे स्थान आहे त्यांच्यापेक्षा काहीसे आगळे स्थान सुभाषबाबूंना आहे. भारतमातेचे ते एक तेजस्वी कंठमणी होते. त्यांनी भारतमातेच्या मुक्तीसाठी आपले सर्वस्व अर्पण केले.

इंग्रजानी हा आर्यावर्त जिंकून नि:शस्त्र केला. या देशातल्या शौर्याच्या व धैर्याच्या लढाऊ परंपरा हळू हळू नष्ट झाल्या. स्वातंत्र्याचा शाब्दिक उच्चार करण्याचेही सामर्थ्य पुढे कोणाच्यात राहिले नाही. पौरुषाची आणि पराक्रमाची राखरांगोळी होऊन गेली. ही राख पुन्हा पेटवून तिच्यातून स्वातंत्र्य प्रीतीचा व देशभक्तीचा अंगार ज्यांनी बाहेर काढला त्या ज्वल-ज्जहाल क्रांतीकारकांच्या मालिकेतील सुभाषबाबू हे शिरोमणी होते. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील ही कामगिरी बजावत असताना त्यांनी जो कष्टाचा हिमा-चल उभा केला तो तर अजोड आहे आणि तरीही दैवाचा दुर्विलास असा की ही भव्योत्कट जीवनगाथा शापीत शोकात्मिका ठरली. एरवी घरच्या संपन्नतेमुळे आणि स्वत:च्या बुद्धी सामर्थ्यामुळे सुखासीन जीवनाची गुलाब पुष्पे चोहोबाजूनी खुणावत असतानाही त्यानी आपले सारे कर्तृत्व मायभूमीच्या मुक्ततेसाठी उफाळून आलेल्या यज्ञकुडात सहजतेने झोकून दिले असता-नाही त्यांच्यावर देशद्रोही असल्याचे आरोप करणे म्हणजे सत्याचा विपर्यास करण्यासारखे आहे.

तसे पाहिले तर सुभाषबाबूंना मुळात राजकार-णाची आवड नव्हती. जीवनाचे अंतिम रहस्य जाणून घेणे हा त्यांच्या मनाचा अगदी लहानपणापासूनचा ध्यास होता. त्यासाठीच तर त्यानी आई वडिलांना न कळविता हिमालयाची वाट धरली. 'स्वामी विवेकानंद

हयात असते तर मी त्याचे शिष्यत्व पत्करले असते' असे त्यांनीच एके ठिकाणी म्हटले आहे. परंतु आपली मायभूमी पारतंत्र्यात खितपत असताना आपण तत्व-चिंतन करीत बसणे त्यांच्या प्रकृतीला मानवण्यासारखे नव्हते. किंबहुना तिच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी धडपडणे हाच आपला कर्तव्ययोग आहे अशी त्यांची मनोधारणा होती.

१९१८ साली ते Indian Civil Service च्या परीक्षेसाठी लंडनला गेले. त्या परीक्षेत त्यांनी ४ था क्रमांक पटकावला. लंडनमधील 'इंडिया ऑफिस' वडचा पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवत असता-नाही सुभाषबाबूंच्या ध्येयवेड्या आणि ज्वलंत विचारी मनाला मायभूमिची सेवा करायची होती. एकदा का परकीय सरकारची चाकरी पत्करली की मायभूमीची सेवा करता येणार नाही हे त्यांना माहीत होते.

मायदेशी परतल्यानंतर त्यांनी देशबंधु चित्तरंजन-दास यांचे सहकारी म्हणून राजकीय आंदोलनात भाग घ्यायला प्रारंभ केला अल्पावधीतच ते पं. जवाहरलाल नेहरू यांच्या समवेत काँग्रेसचे चिटणीस झाले. काँग्रेसने यापुढे वसाहतीच्या स्वराज्यावर समाधान मानता कामा नये, संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली पाहिजे आणि ती मागणी कृतीत आणण्यासाठी प्रतिसरकारची स्थापना करण्यातही पुढाकार घेतला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांचे गांधीजींशी मतभेद होऊ लागले. अहिंसेनेच स्वातंत्र्य मिळविले पाहिजे हा गांधीजींचा अतिरेकी आग्रह सुभाषबाबूंना मान्य नव्हता. या त्यांच्या मतभेदामुळे काँग्रेस संघटनेमध्ये ते एकाकी कसे पडतील या दृष्टीने गांधीजींची पावले पडू लागली. गांधीजींची लोकप्रियता सुभाषबाबूंना उमगत होती. परंतु त्यामुळे आपण आपले विचार बोलूनच दाखवायचे नाहीत ही प्रवृत्ती याना पूर्णपणे नापसंत होती. 'सर्वांनी आपली बुद्धी गांधीजींकडे गहाण का ठेवावी हेच मला समजत नाही-' असे त्यांनी 'दि इंडियन स्ट्रगल' या ग्रंथात म्हटले आहे ते याच कारणासाठी. गांधीवादाला आत्म्याची इतकी चिंता लागलेली आहे की त्यात शरीरसामर्थ्य आणि लष्करी सामर्थ्य यांना मुळीच स्थान नाही हा त्यांचा मुख्य आक्षेप होता.

"रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?" या सावरकरांच्या विधानाशी ते सहमत होते. त्यासाठी सशस्त्र क्रांतीचीच आवश्यकता आहे असे त्यांचे ठाम मत होते. सुभाषबाबू विचार स्वातंत्र्याबाबत तडफेने बोलत असले तरी व्यक्तीपेक्षा संघटना श्रेष्ठ असते याचेही त्यांना भान होते. त्यामुळे गांधीजींशी आपले यापुढेही मतभेद होणार हे माहीत असूनही त्यांनी गांधीजींच्या सूचने-नुसार १९३९ मध्ये हरिपुरा येथे भरलेल्या अधिवेशनात काँग्रेसचे अध्यक्षस्थान स्विकारले सुभाषबाबूंनी आपले विचार कधी दडपून ठेवले नाहीत 'भारताने आता औद्योगीक क्रांतीला सिद्ध असले पाहिजे' हा गांधीजींना न रुचणारा विचार त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलून दाखविला.

अध्यक्षपद दिल्यानंतरही सुभाषबाबूंची वृत्ती मवाळ होत नाही हे पाहिल्यानंतर सुभाषबाबूंची पुन्हा अध्यक्षपदावर निवड करायची नाही असे गांधीजींनी ठरविले. सुभाषबाबूंनाही अध्यक्षपदाचा हव्यास नव्हता. पण त्या सुमारास युरोपमध्ये महायुद्धाचे ढग जमा होऊ लागले होते. ही संधी साधून आपण इंग्रजाविरुद्ध उठाव केला पाहिजे असे सुभाषबाबूंना तीव्रतेने वाटू लागले. उलट इंग्लंड अडचणीत सापडलेले असताना आपण उठाव करणे योग्य नाही असे गांधीजींचे मत पडले. अशावेळी पक्षाची सूत्रे आपल्या हातात असतील तर पक्षाला आपल्या मनाप्रमाणे क्रांतीकारक स्वरूप देता येईल या विचाराने सुभाषबाबूंनी अध्यक्षीय निवडणुक लढविण्याचे ठरविले. या निवडणुकीत ते गांधीजींचा उमेदवार पट्टाभि सितारामय्या यांच्याविरुद्ध बहुमताने निवडुन आले. गांधीजीना हा आपला पराभव रुचला नाही. गांधीजीनी हा वैयक्तीक प्रतिष्ठेचा प्रश्न बनवू नये असे सुभाषबाबूंनी त्याना नम्रतापूर्वक सांगि-तले. पण गांधीजींच्या मनाला हा पराभव बोचत होता. म्हणून त्यानी सुभाषबाबूंना सहकार्य करू नका असा आदेश कार्यकारिणीच्या सदस्याना दिला. याचा परि-णाम त्रिपुरी येथील अधिवेशनात सुभाषबाबूंनी अध्यक्ष-पदावरून मांडलेला "येत्या सहा महिन्याच्या आत भारताला स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळाला नाही तर देशभर कायदेभंगाची चळवळ सुरु होईल." हा ठराव फेटाळण्यांत आला. इतकेच नव्हे तर महासमितीच्या

बैठकीमध्ये सुभाषबाबूंच्यावर अविश्वासाचा ठराव मांडण्याच्या कारवाया सुरू झाल्या.

आपली सर्व बाजूनी कोंडी करण्यात येत असलेली पाहून सुभाषबाबूनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. महायुद्धाची संधी काही महिन्यावर येऊन ठेपलेली असताना स्वबलाने स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न हुकला याचे सुभाषबाबूना कमालीचे दुःख झाले. परंतु निराश होऊन स्वस्थ बसणे सुभाषबाबूच्या प्रकृतीला मानवण्यासारखे नव्हते. देशात राहून आपल्याला स्वातंत्र्ययुद्ध लढता येत नसेल तर परदेशात जाऊन ते लढले पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले.

१९३९ साली इंग्लंडविरूद्ध जर्मनी यांच्यापासून महायुद्धाला सुरवात झाली. हिटलर (जर्मनी) कोणत्या विचारानी भारावून गेलेला आहे हे सुभाषबाबूना माहित नव्हते असे नाही. परंतु आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र हे राजनितीतले सनातन सूत्र त्याना माहित होते. म्हणूनच ते १० जानेवारी रोजी वेषांतर करून ' जियाऊद्दीन ' हे नांव धारण करून काबूल मास्को मार्गे जर्मनीत पोहोचले. त्यांनी हिटलरकडे भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी मदतीची अपेक्षा केली. ही अपेक्षा करीत असताना जर्मन सैन्याने भारताच्या मुक्ततेसाठी प्रयत्न करावा अशी त्यांची मुळीच इच्छा नव्हती. जर्मनीच्या मदतीने ते भारतीय सैन्यदल उभे करणार होते आणि त्यानीच ते कार्य पार पाडले पाहिजे याबद्दल ते निग्रही होते. परंतु जर्मनीकडून आपल्या अपेक्षा पुऱ्या होत नाहीत याचा अंदाज येताच सुभाषबाबूनी इंग्रजाविरुद्धचे राष्ट्र जपानची मदत घेण्याचे ठरविले. आणि ते जपानला गेले. तेथे भारतीय क्रांतिकारक देशभक्त रासबिहारी बसु यांच्याकडून त्यानी आझाद हिंद सेनेची सूत्रे आपल्या हातात घेतली. त्यांनी आपल्या सैन्याला 'चलो दिल्ली' चा आदेश दिला. अशा या निधड्या छातीच्या स्वातंत्र्यवीराने, क्रांतीकारकाने ब्रिटीश सत्तेविरूद्ध शस्त्र उगारले. नेताजींच्या या कार्यासाठी आपल्या देशबांधवानी लाखो रुपयांची मदत केली. स्त्रियांनी आपले दागिने दिले. हजारो लोकानी सुभाषबाबूंच्या या आव्हानास प्रतिसाद दिला. ते आपल्या देशवासियांना म्हणत

" तुम मुझे खून दो
मैं तुम्हे आझादी दुंगा ।"

अशा या स्फूर्तिदायत्वामुळे सर्वत्र उत्साह संचारला. फौजेतही उत्साह निर्माण झाला

' कदम कदम बढाये जा
खुषीके गीत गाये जा ।'

हे त्यावेळचे गीत प्रसिद्ध आहे.

आपल्या या प्रयत्नातून भारताची सूत्रे परसत्तेकडे जाता कामा नयेत यासाठी सुभाषबाबू दक्ष होते. तसे आश्वासन त्यानी जपानच्या अध्यक्षांच्याकडून घेतले होते. ते आपल्या सहकाऱ्याना सतत सांगत होते, भारतीय भूमीवर रक्ताचा पहिला थेंब सांडला पाहिजे तो आपल्या सैनिकांचा. कुठल्याही परकीय सैनिकाला ते श्रेय मिळता कामा नये. तरीदेखील भारतातले यांचे पूर्वीचे सहकारी सुभाषबाबू जपान्यांचे हस्तक झालेले आहेत असा धाधान्त खोटा प्रचार करीत होते. आपण सच्चे देशभक्त आहोत हे आपल्या देशबांधवानाच सांगण्याची पाळी आपल्यावर येईल याची सुभाषबाबूना कल्पना नव्हती पण ती वेळ आलेली होती.

आझादहिंद नभोवाणीवरून गांधीजीना उद्देशून सुभाषबाबू म्हणाले. परकीय राष्ट्रांची मदत घेतल्याशिवाय भारत स्वतंत्र होणार नाही हे मी पूर्ण विचाराने ठरवूनच हा मार्ग स्विकारला आहे. अशावेळी देशद्रोही म्हणून माझी संभावना करणे म्हणजे जाणून बुजून सत्याचा अपलाप करण्यासारखे आहे. जर्मना जपान सारख्या देशानी माझा हस्तक म्हणून उपयोग करून घेण्याइतका मो खुळा नाही. देशद्रोही असे कृत्य माझ्या हातून घडणार नाही, याची आपल्याला तरी खात्री खात्री पटावी.

इतकेच नव्हे तर एकदा देश स्वतंत्र झाला की मी आपले कार्य संपले असे समजून राजकारणातून निवृत्त होईन असेही त्यानी गांधीजीना सांगितले होते. यावरून सुभाषबाबूना स्वातंत्र्य प्राप्तीशिवाय दुसरा कोणताच हव्यास नव्हता हे स्पष्ट होते.

परंतू पुढे युद्धाचे फासे उलटे पडू लागले. इंफाळपर्यंत पोहोचलेल्या आझाद हिंद सेनेवर माघारीचीद

( पुढील मजकूर पान नं. ३७ वर पहा. )



Scanned with CamScanner

(पुस्तक परीक्षण)



रुचि सुंदर

# 'रान करवंदं'

**अशोक पट्टणशेटी**
प्र. व. साहित्य

तुम्ही रानकरवंद खाल्ली आहेत ? म्हणजे तशी खाल्ली असतील. पण ही मात्र पुस्तकातील आहेत अवश्य एकदा खाऊन बघा.

प्रा. चंद्रकुमार नलगे यांची ' रानकरवंद ' प्रकाशित होऊन अल्पावधित या रानकरवंदांनी मात्र साऱ्या महाराष्ट्राला डुलवलं आहे, भुलवलं आहे. "रानकरवंद" हा प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या दहा निवडक कथांचा संग्रह आहे. या संग्रहांतल्या प्रत्येक कथा वाचकांच्या अंतःकरणाचा ठाव घेणाऱ्या आहेत, काळजाला हात घालणाऱ्या आहेत. या कथांमध्ये वापरलेली भाषा ही ग्रामीण भाषा आहे. ही भाषा खेड्यापाड्यातली, दऱ्याखोऱ्यातली आणि आढ्यानाल्यातली आहे खेड्यापाड्यात आणि रानावनात वाढलेली, दररोज रात्र-दिवस कष्ट करून कसतरी पोटापुरतं मिळवणारी अशी ही गरीब माणसं आहेत. पण त्यांच्या अंतःकरणात खालवर कुठतरी एक माणुसकीचा अंकुर फुललेला आहे असं दृश्य आपणाला दिसतं.

सर्व कथेतली पात्रं विविध रूपं घेऊन आलेली आहेत. एक खबीर मनाची म्हातारी, दुसरा लाचार मास्तर, तिसरा अहोरात्र लेखकाची साथ करणारा नाथा, लेखकाला जीवापाड जपणारे दादा, अशी अनेक पात्रं या कथांत विखुरली आहेत. प्रत्येक पात्राचं व्यक्तिमत्व लेखकाने अत्यंत कौशल्याने रंगवलं आहे. प्रत्येक कथा हळुवारपणे उलगडत जाते. ती वळणे घेत घेत एका विशिष्ठ स्थितीपर्यंत येऊन पोहोचते.

या कथासंग्रहातील भाषेचं एक खास असं वैशिष्ठ्य आहे. ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जाणारे व्यंकटेश माडगूळकर, अण्णाभाऊ साठे, आनंद यादव यांच्याप्रमाणेच पाऊल ठेवून यानीही ग्रामीण भाषेची आराधना केली आहे. त्यामुळेच या कथा इतक्या जिवंत आणि ज्वलंत वाटतात. यातील भाषा ही थोडीशी वेगळी वाटली तरी ती कृत्रिम वाटत नाही. कारण ही भाषा काही ओढून ताणून आणलेली भाषा नाही. लेखक प्रत्यक्ष ग्रामीण भागात वावरलेले आहेत. खेड्यापाड्यातील आणि दऱ्याखोऱ्यातील लोकांचं जीवन त्यांनी जवळून पाहिलं आहे. आणि अनुभवलंही आहे. या कथासंग्रहाचे लेखक प्रा. नलगे हे आमच्याच कॉलेजात प्राध्यापक असल्याने त्यांचं जीवन मी जवळून पाहिलं आहे. ही ग्रामीण भाषा अवगत व्हायला तसं ग्रामीण जीवनही जगावं लागतं, त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्या लागतात



Scanned with CamScanner

आणि त्यांच्या जीवनाशी समरस व्हावं लागतं. आज काही लेखक आलिशान बंगल्यात बसून आणि पंख्याच्या गार वाऱ्याचा उपभोग घेत ग्रामीण जनतेच आणि जीवनाचं चित्र रेखाटण्याचा केविलवाणा प्रयत्न करताना दिसतात. पण त्यांना एवढच सांगावस वाटत की ज्या जीवनाचं आपण चित्र रंगविणार आहोत ते जीवन प्रत्यक्ष अनुभवायला हवं, त्यांच्या हालअपेष्टा आणि सुखदुःखं भोगायला हवीत या भाषेतले शब्द कुठल्या शब्दकोशात मिळणार नाहीत. त्यांच जीवन म्हणजेच ही भाषा आणि त्यांची सुखदुःखं हेच त्यांचे शब्द. हे झालं भाषेविषयी. आता थोडं कथानकाकडं वळू या.

प्रत्येक कथा ही एका उपेक्षित जीवनाची कथा आहे. त्यांच्या 'वळी' या कथेतली धाकू वयानं अत्यत म्हातारी झाली आहे. सारं अंग जिणलेलं आहे, शरीर थकलेलं आहे, पण मन मात्र अजुनी हिरवं टवटवीत आहे. मनातल्या खोल कप्प्यात कुठंतरी एक माणुस-कीचा अंकुर फुलतो आहे. स्वातंत्र्याबद्दलचा तिचा अभिमान तर तिच्या रोमारोमात भिनलेला आहे. साधी भोळी धाकू पण मनाची खंबीर आहे. "शल्य" च्या कथेत त्यांनी लहान मुलामुलींच्या बाहुल्याबाहुलींच्या लग्नाचे वर्णन करून प्रत्यक्षातल्या दोन तरुण-तरुणींच्या मनातील प्रेमभाव फुलविला आहे. पुतळ्याची माळ न घातल्यानं मोडलेल्या लग्नाचं दृश्य पाहून आपल्याही भावना दुखावल्याशिवाय राहात नाहीत.

"न्हवली पलवली" अशी सुरुवात करून लहान मुलांचे बोबडे बोल त्यानी तितक्याच बालिशपणे रेखा-टले आहेत. "रानकरवंदं" मध्ये पतीच्या नसलेल्या वैभवावर भूललेली आणि विश्वासघातानं आपल्यावर अनाठायी प्रसग ओढवून घेतलेली स्त्री आपणास दिसते. असं असलं तरी तिचं वात्सल्य दैवाने पदरात पडलेल्या त्या मुलाचा त्याग करावयास तयार नाही. अशी स्त्री पाहिली की स्त्रीचं जीवनच नजरेसमोर उभं रहातं. स्त्रीच्या उपेक्षीत आणि लाचार जीवनाची आणि उध्वस्त झालेल्या संसाराची समस्या त्यानी अतिशय सुंदर रीतीने वाचकांसमोर मांडली आहे.

खुळ्या नामूनं तर खूळच लागतं. एक साधा भोळा खुळा. केवळ एक विडी सर्वस्व मानणारा खुळा नामू. पण त्याच्या अंतःकरणातली प्रीतीची भावना पाहिली की शहाण्यालाही वेड लागल्याशिवाय रहात नाही. तो आपल्या रानातल्या मैत्रिणीला आपली बायको समजतो, आणि तिला भेट म्हणून मंगळसूत्र घेऊन येतो. कारण त्याला माहीत असते की लग्नात पत्नीच्या गळ्यात मंगळसूत्र घालतात. केवढी पवित्र आणि उदात्त अशी प्रीतीची भावना ! पण असं असूनही या नामूला सर्वजण खुळा म्हणतात. त्या 'हिरी'चं लग्न ज्यावेळी ठरतं त्यावेळी या नामूला फार यातना होतात सारं जग आपल्याभोवती गरगर फिरत आहे असं त्याला वाटतं असा एक अत्यंत दिलदार मनाचा खुळा वाट-णारा पण शहाण्यालाही खूळ लावणारा हा नामू वाच-कानाही खूळ लावतो. "घोळ" या कथेत काल्पनिक भूत दाखवून त्यानी साराच घोळ घातला आहे. जाता जाता समाजाच्या धार्मिक समजुतीवरही त्यानी प्रकाश टाकलेला आहे. खेकडा धरायला जाऊन नागानं चाव-ल्याने रक्तबंबाळ झालेला आणि लेखकाच्या सतत पाठीशी असणारा नाथा, ज्यावेळी लेखकाला अनाथ करतो त्यावेळी आपणालाही पोरकं झाल्यासारखं वाटल्याशिवाय रहात नाही. आपल्या वयाचं कुणी उरलं नाही म्हणून कातरसा शोक करणारा दादा, आयुष्यभर बे-एके-बे चा धडा गिरवणारे आणि लाचा-रीने जगणारे मास्तर, ही माणसं लेखकानं इतकी जिवंत रेखाटली आहेत की ही माणसं कधीच आपल्या नजरे-समोरून हलणार नाहीत "बे एके बे" ही कथा तर एका ज्वलंत समस्येचीच कथा आहे, ही कथा म्हणजे मास्तरांच्या उपेक्षित आणि लाचार जीवनाची शोककथाच आहे. समाजात चाललेली मास्तरांची उपेक्षा, शिक्षणांत तोंड खुपसलेले राजकारणी सत्तेच्या जोरावर मास्तरांना लुबाडणारे आणि त्यांना धाक दाखविणारे पुढारी, स्वतःला बृहस्पतीचे अवतार समजणारे मुलांचे पालक आणि विशेष म्हणजे या सर्वां-कडं अजिबात दुर्लक्ष करणारं आपलं शिक्षणखातं यासर्वांचं लेखकानं इतकं जिवंत आणि ज्वलंत चित्र रंगविलं आहे की तो मास्तर तसाचा तसा आपल्या डोळ्यासमोर उभा रहातो.



Scanned with CamScanner

सध्याच्या संस्कारहीन आणि संस्कृतीहीन अशा समाजाचं जीवन त्यानी फार सुंदर रीतीनं रेखाटलं आहे. मास्तराच्या जीवनाचं नाट्य तर त्यानी फारच सुंदर रीतीनं रंगविलं आहे. या साऱ्या हालअपेष्टा लेखकाच्या व्यक्तिगत जीवनातही अनुभवायला मिळाल्या आहेत. त्यांनी या कथासंग्रहात वापरलेल्या काही ग्रामीण शब्दांचे नमुने पहा.

" खोपाट, जलम, इरसाल, ख्योळखंडुबा, वंगाळ, टिपरघाई, दणका, पेकाट, वंगाळ, जंजाळ, चिडीचीप, इस्वास, सावाट, बांग, सफय, गपगुमान इ. ग्रामीण शब्द हे खास त्यांचे आहेत. त्यानी या कथासंग्रहात पेर–लेली काही वाक्यं पाहिली म्हणजे त्यांच्या या ग्रामीण भाषेचं सौंदर्य आपणाला सहज समजून येईल.

" दत्ता, प्वॉट भरून खा लेका. येळंला तुकडा मिळतु न मिळतु "

" कोंबड्यानं बांग दिली. "

" पोरी ! कशाला जातेस शेरगावात ? काय हाय तिथं ? आपुन शेतकऱ्याची पोर. घरचा चारा अन् रानचा वारा. हाच बरा. माती पिकवायची अन् मातीसारखं बख्खळ खायाचं. " " खऱ्याच्या डोक्यावर पाय ठेवून खोटयाला स्वतःच्या डोक्यावर घेऊन नाच–णारा हा समाज " " आवं, झक्क मारती साळा. मी हाय पंचायतीचा मेंबर. आवं, आमी हाय तर तुमी हाय. कसं ?" " आंवं मागतय. वागेला मरून --- त्येनं इयागिरी ठेवलीय का न्हाय मागं ? हातावरलं प्वॉट आमचं --- आँ --- सांग की कुठन घालायचं हेच्या मढ्यावर ? --' ' विरुबाच्या माळावर अंधार जळत होता. '

अशा एकापेक्षा एक सुंदर वाक्यांनी नटलेची ग्रामीण भाषा जिवंत आणि ज्वलंत व्यक्तिचित्रं आणि हळुवारपणे आकार घेणाऱ्या कथा या साऱ्या वैशिष्ठ्यांचं सुरेखसुंदर असं मीलन या करवंदंत झालं आहे म्हणूनच ही रानकरवंदं अवीट आहेत, रसाळ आहेत, मधाळं आहेत. अनेक रसानी थवथबलेली अशी ही रानकरवंदं आहेत. पण ही तोडताना काही वेळा हातही रक्तबंबाळ झाले आहेत, साऱ्या हातापायातून भळाभळा रक्तही वाहिले आहे आणि म्हणूनच ही रानकरवंदं वाचकांच्या जीभेवरून कधीच विरणार नाहीत.

✕

---

( पान नं. ३४ वरून पुढे चालू )

पाळी आली. जपान आता शरणागती पत्करणार ही गोष्ट स्पष्ट होऊन चुकली होती. तरीही सुभाषबाबूंचा निर्धार हादरला नाही. रशियात जाऊन स्वातंत्र्यसंग्राम चालू ठेवायचा त्यांचा विचार होता. रंगून सोडण्यापूर्वी ते म्हणाले, आता माझी एकच इच्छा आहे. मायभूमीच्या स्व तंत्र्यसिद्धीसाठी लढताना हा देह धारातीर्थी पडावा. बस्स, मला दुसरे कांही नको. परंतु मधेच त्याना अप–घाताने गाठले आणि पुढे काय झाले ते कुणालाच नेमके कळले नाही. ते जिवंत आहेत की नाही हे गूढ अजून कोणासही उकलता आले नाही.

त्यामुळे असे वाटते की विद्युल्लतेशी जवळीक साधणारे सुभाषबाबूंचे कर्तृत्व जेवढे तेजाळ होते तेवढेच ते शापीतही असावे. आणि म्हणूनच ही तेजाळ जीवन–गाथा शापीत शोकात्मीका ठरली.

✕ ✕



Scanned with CamScanner

## नव्या मनूचे-नवे शिपाई....



प्राचार्य अंबादास माडगूळकर आणि एन्. सी. सी. प्रमुख श्री नाळे यांचे समवेत छात्र सैनिक.

Scanned with CamScanner

आम्ही न मागे .... झडो चौघडा ....!



प्राचार्य अंबादास माडगूळकर आणि लेडीज एन्. सी. सी. प्रमुख प्रा. सौ. जगताप यांच्या समवेत लेडीज् एन्. सी. सी.

Scanned with CamScanner



## हिंदी विभाग



शान्त, स्निग्ध, ज्योत्स्ना उज्ज्वल ।
अपलक अनन्त, नीरव भतल ।।
सैकत शैय्या पर दुग्ध धवल,
तन्वंगी गंगा ग्रीष्म विरल ।

Scanned with CamScanner

# गीत

'सपनोंके सौदागर' से मिलने आया 'गँवार'।
पुछने लगा 'कब ? क्यूं ? और कहाँ ?' होना है
'प्यार ही प्यार'।।
'प्यारका सपना' लेकर 'अभिलाषा' कि 'साथी' की।
'हिम्मत' से 'बाजी' लगायी 'फर्ज' निभाने की।।
'तलाश' में 'हमजोली' की आया भी 'अफसाना'।
'आँखे' लडो इक 'देवी' से बना 'अनाडी' 'दिवाना'।।
'प्रेम पुजारी' कहने लगा 'तुमसे अच्छा कौन है'।
'नई जिंदगी' हो 'मेरे हुजूर' मुझ पर 'एहसान' है।।
'यकीन' कर लो 'साजन' मेरे मुझे 'आराधना' है तुम्हारी।
'खिलौना' न बनाकर रखना 'प्रिया' 'पहचान' मेरी।।

**ए. एस्. शिंदे**
प्र. व. वाणिज्य

# वर्षा–रानी

आयी आयी
आगयी वर्षारानी

प्यारसे गाती झूमती
हर्षसे लहराती–मुस्कराती
आगयी वर्षा रानी।

कलियोंको खिलाकर
फूलोंको हँसाकर
आगयी वर्षारानी।

इस धरती को दुलहन बनाकर
मानव को सुख दे कर
आगयी वर्षारानी।

**सूर्यकान्त घुगरे**
द्वि. व. साहित्य.



Scanned with CamScanner

# चाँदनी रातमें नौकाविहार--



पूनमकी उजली रात थी। आसमानमें करोंडो कोहिनूर झूम रहे थे। आसमान अपना रत्नका खजाना मानवको दिखा रहा था। और इस धरतीपर की हरएक चीज चंद्रमाकी रश्मियोंका अमृत बडे चावसे प्राशन कर रही थी। और कवि गुप्तजीकी ये पंक्तियाँ मूर्त स्वरूपमें पा रही थी,–

चालचंद्रकी चंचल किरने खेल रही थीं जलथलमे।
स्वच्छ चाँदनी बिछी हुओ है अवनी और अंबरतलमें॥

ऐसीही मादक घडियोंमें कौन ऐसा निरस हृदयवाला होगा कि जो नदीकी लहरोंके निमंत्रणका अस्विकार करे? हमने भी नदीमे नौका विहार करनेका तय किया।

नदीकिनारे लोग आनंद मना रहे थे। घाटके पास होनेवाले वृक्ष-लताओंपर जुगनू जल-बुझ रहे थे। बहुत लोग चाँदनी रातमें नौका विहारका आनंद लूट रहे थे। हम भी एक नावपर सवार हुओ और थोडीही देरमें हमारी नाव मंथर गतिसे चलने लगी। घाटपर एक ओर बच्चे खेल रहे थे तो दूसरी ओर कई आदमी अपनी बीवी बच्चोंके साथ वार्तालाप करनेमें मग्न थे। नाविकने नावका पाल खोल दिया था और अब नाव टेढी-मेढी होती चल रही थी। ऊपर नीला आसमान और नीचे नीला सागर। हृदय गा रहा था,–

"झूमे चंद्रमा झूमे आसमान,
तन मेरा नाचे हो नाचे भी दरिया
रातका समाँ।"

आसमानका चंद्रमा स्नेहमयी दृष्टिसे नीचे देख रहा था। सभी अस्पष्ट किंतु मधुर स्वरमे गाते गाते नावकी तेजोसे दौड रहे थे। कभी नाव इस ओर मुडती, कभी उस ओर। यहाँ तो नावको मार्ग देनेके लिए न तो पुलिस खडे थी, न एकमार्गीय रास्ते (One way traffic)। कविकी कल्पनाकी भाँति नाव आगे बढतेही जा रही थी। दूर आकाशमें चंद्रमा ऐसा लगता था मानो हमारे करीब आ रहा हो। जलमें उसका प्रतिबिंब ऐसा प्रतीत होता था जैसे उसे चंद्रने हमें लेनेके लिए भेजा हो। नावमें बैठकर दूर तटपर खडे होनेवाले वृक्ष अद्‌भुत लगते थे। मित्र के मधुर कंठका चमत्कार तो हमने आजही देखा था। दिल बाग-बाग हो उठता था। सैर छोडनेको तो मन ना कर रहा था। पर लौटना ही था।

किनारे पर थोडा आराम कर और थोडा जलपान कर हम घर लौटे। आते समय नदीपर वडस्वर्थ मूर्त स्वरूपमें आ रहा था,–

Moveless fish in the water gleem
by silvery reeds in a silvery stream.

---

कु. ज्योत्स्ना श्री. आसगांवकर
पदवी पूर्व साहित्य

---

# चाँद - -

चाँद की आत्मकथा सुननेका उन सभी लोगोंको अधिकार हैं, जिनें रूप पर जीने और मरनेका शौक हो। वह रूप की जिंदगी ही जीना जानता हैं, और केवल अपने जैसे ही रसिकों से प्रेम करता है। अगर आप सौंदर्य का मल्य जानते होंगे तो उसकी बातों में अवश्य दिलचस्पी लेंगे।

मेरे जन्म के बारें में मैं विशेष नही जानता। इतना जरूर सुना है कि मेरा जन्म पृथ्वी से हुआ। यह कितनी दुःखद बात है, कि जन्म होते ही मैं जननी से अलग हो गया। अलग होकर चारों ओर घूमने लगा। आप जरा उस छोटे शिशु की कल्पना करीयें भी तो जो अपनी माँ को देख रहा हो, पर उसके निकट न जा सकता हो। ठीक यही दशा मेरी है, पता नही कि मुझे यह किस पाप का फल मिल गया। धीरे-धीरे असख्य तारों के साथ रहकर मेरा मन रम गया और आकाश में खेल खेलने लगा।

रूप की दौलत मुझे जन्म से ही मिली है। यह दौलत मुझे अपने नाना सूर्यदेव से मिली है। अपने इस रूपसें मैने सभीका मन मोह लिया है, और धरती के लोगोंका दुलगारा वन गया हूँ। धरतीपर रहनेवाली मेरी बहने अपने शिशुओं को मामा के रूप में मेरा परिचय देती हैं। मैं ससार के सभी बच्चों का मामा वन गया हूँ। तको उँगली उठाकर जब तुम गाते हो " चंदामामा आ जा, दूध भात खा जा " तो मैं निहाल हो जाता हूँ। मै कवियों और कलाकारों का भी प्रिय वन गया हूँ। एक बार एक कवि अपनी नायिका के रूप का वर्णन कर रहा था। तब उसकी दृष्टी मुझपर पडी, और उसने उसे चंद्रमुखी कहा फिर तो प्यार करने लगा। विना मुझसे संबंध जोडे उनकी कवितामें जान ही नहीं आती। इसी प्रकार चित्र-कारों ने भी अपने चित्रों में मुझको अंकित किया। जिस चित्र में मैं और मेरी प्रिय चाँदनी की शोभा अंकित हो जाती है। उसको देखकर किसका दिल बाग-बाग न हो जायेगा ?

